## सुविचार

"जीवनातील नाती आणि अनुभव हे हाताने नाही, तर मनाने जपले जातात. प्रत्येक आनंदाचा क्षण आणि प्रत्येक वेदनेचा धडा आपल्याला 'जगण्याची कला' शिकवतो. फक्त जो मनाने टिकतो, तोच आयुष्याचा खरा साथीदार ठरतो."

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## बिहारी मजुरांना केरळमध्ये मारहाण

**तिरुवअनंतपुरम :** केरळच्या पलक्कडमध्ये चोरीच्या संशयावरून छत्तीसगडमधील एका मजुराला मारहाण करून ठार मारण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. या पाच जणांना गुरुवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली, अशी माहिती वालयार पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने दिली. सर्व आरोपींवर भारतीय दंड संहितेनुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २० डिसेंबर, २०२५ | वर्ष - १ | अंक - ८७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### "माजी नगरसेवक विशाल तांबे यांचा राजकारणातून संन्यास"

**जम्मू :** पुणे महापालिकेचे माजी नगरसेवक विशाल तांबे यांनी अचानक राजकारणातून संन्यास जाहीर केला आहे. महानगरपालिका निवडणूक प्रक्रिया सुरू असताना घेतलेल्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का बसला आहे. तांबे हे शरद पवार व सुप्रिया सुळे यांचे निकटवर्तीय मानले जात होते. त्यांनी २००७, २०१२ आणि २०१७मध्ये सलग तीनवेळा धनकवडी येथून विजय मिळवत नगरसेवक, तसेच स्थायी समिती अध्यक्ष म्हणूनही काम केले. कुठेही नाराजी नसून १९ वर्षांच्या सार्वजनिक जीवनानंतर थांबण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रक्रियेत हा निर्णय प्रदेशाध्यक्ष समोर मांडल्याचे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

### ३१ डिसेंबरआधीच हात साफ! दोन लाखांची शेळी-बोकड चोरी

**पुणे :** नववर्ष स्वागतासाठी विक्रीसाठी आणलेली शेळी-बोकड चोरट्यांनी पळवून नेल्याची धक्कादायक घटना हडपसरमधील गोंधळेनगर परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. हडपसर येथील गोंधळेनगर भागात कॅनॉललगत असलेल्या मोकळ्या जागेत तक्रारदाराने कंपाउंड करून शेळी-बोकड पाळले होते. सुमारे २ लाख रुपये किमतीची ही बोकड ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. मात्र दोन दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्यांनी कंपाउंड तोडून सर्व शेळी-बोकड चोरून नेल्याचे उघड झाले.

## शिवसैनिकांचा भाजपला थेट विरोध

# मुंबई, महत्त्वाच्या पालिका युती धोक्यात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : राज्यात महायुतीची बाह्य एकजूट जाहीर सभांपुरती आणि पत्रकार परिषदांपुरती मर्यादित राहिल्याचे चित्र आता स्पष्ट होत आहे. मुंबईसह पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नवी मुंबई या सत्ताकेंद्र असलेल्या महापालिकांमध्ये भाजप-शिवसेना युती अंतर्गत कुरघोडी, अविश्वास आणि दबावाच्या राजकारणात अडकली आहे. विशेषतः मुंबईत भाजपकडून दगाफटका झाल्यास स्वतंत्र निवडणूक लढवण्याची तयारी शिवसेनेत उघडपणे सुरू झाली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर शिवसैनिकांचा रोष आणि दबाव दिवसेंदिवस तीव्र होत आहे.**



मुंबई महानगरपालिकेच्या २२७ वॉर्डांपैकी १५० जागांवर एकमत झाल्याचा दावा सत्ताधारी नेते करत असले, तरी उर्वरित ७७ जागांवरून युतीत उघड संघर्ष दिसू लागला आहे. या ७७ जागांमध्ये शिवसेनेचे पारंपरिक बालेकिल्ले आहेत. मात्र, त्याच जागांवर भाजपने दावा ठोकल्याने शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष खदखदत आहे. 'बालेकिल्ले सोडायचे नाहीत,' असा थेट संदेश शिवसैनिकांकडून नेतृत्वाला दिला जात आहे.

संयुक्त पत्रकार परिषदेत युतीची भाषा बोलली जात असली, तरी प्रत्यक्षात शिवसेनेकडून २२७ही वॉर्डांसाठी इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. भाजपकडून दबाव वाढल्यास स्वतंत्रपणे मैदानात उतरावे, अशी ठाम भूमिका अनेक इच्छुकांनी मांडली आहे. "स्वतःच्या जागांवर दुसऱ्याचा झेंडा कसा?" असा सवाल आता उघडपणे केला जात असून, त्यामुळे शिंदे यांची कोंडी अधिकच वाढली आहे.

दुसरीकडे, भाजपकडून मात्र आत्मविश्वासाचे विधान सुरू आहे. 'महायुतीचाच महापौर बसणार,' असा दावा भाजप नेत्यांकडून वारंवार केला जात असला, तरी प्रत्यक्षात जागावाटपावरून युतीतील तणाव लपवता येत नसल्याचे चित्र आहे. उर्वरित ७७ जागांवरील अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील, असे सांगितले जात असले, तरी जमिनीवरील असंतोष नेतृत्वाच्या पलीकडे गेल्याची चर्चा आहे. मुंबईबरोबरच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्येही आतून नाराजीचे सूर उमटू लागले आहेत, तर नवी मुंबईत जागावाटपाबाबत पूर्णतः सावध भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे एकाच महायुतीत असूनही प्रत्येक महानगरात वेगळे राजकीय गणित मांडले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मुंबईतील ७७ जागांचा पेच सुटतो की शिवसेना स्वतंत्र लढ्याची घोषणा करते, यावर केवळ मुंबईच नव्हे तर राज्यातील सत्तासमीकरणांचे भवितव्य ठरणार आहे.

### शिवसेनेचा रोष का वाढतोय?

- भाजपकडून शिवसेनेच्या बालेकिल्ल्यांवर थेट दावा
- ७७ वॉर्डांवर स्पष्ट तोडगा नसल्याने संभ्रम
- 'महापौर भाजपचाच' या दाव्यामुळे शिवसैनिकांमध्ये नाराजी
- स्वतंत्र लढ्याची मागणी इच्छुकांकडून वाढली
- शिंदेंसमोर युती की संघटना — कठीण निर्णय

# माणिकराव कोकाटेंना उच्च न्यायालयाचा दिलासा

## दोषसिद्धी कायम, शिक्षेला स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकेचा लाभ घेतल्याप्रकरणी क्रीडामंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) नेते ॲड. माणिकराव कोकाटे यांची अटक उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे टळली. दोषसिद्धी कायम ठेवत न्यायालयाने शिक्षेला स्थगिती देत जामीन मंजूर केला. नाशिक सत्र न्यायालयाने कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवत अटकेचे आदेश दिले होते. त्या निर्णयाला स्थगिती मिळावी यासाठी कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.



उच्च न्यायालयाने प्रकरणातील पूर्वीचे निकाल आणि नोंदी पाहता गुन्ह्यातील सहभाग सकृतदर्शनी दिसून येतो, असे निरीक्षण नोंदवले. त्यामुळे दोषसिद्धीला स्थगिती देण्यास नकार देत शिक्षेच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्यात आली. दरम्यान, एक लाख रुपयांच्या वैयक्तिक हमीवर कोकाटे यांना जामीन मंजूर करण्यात आला.

## २१ डिसेंबरला मतमोजणी; १४३ जागांवर रंगणार प्रतिष्ठेची लढत

# राज्यात २३ नगरपरिषद-नगरपंचायतींसाठी आज मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे तापमान चांगलेच चढले आहे. राज्यातील २३ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी अध्यक्ष आणि सदस्य पदांसाठी तसेच नगरपरिषदांमधील एकूण १४३ जागांसाठी उद्या मतदान होणार असून संपूर्ण निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. दि. २ डिसेंबरला राज्यातील इतर २६३ नगरपालिका व नगरपंचायतींसाठी मतदान पार पडले. मात्र काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेल्या या २३ निवडणुका आता २० डिसेंबर रोजी पार पडणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार दि. २ डिसेंबरला मतदान पार पडले. उर्वरित २३ नगरपरिषदांसाठी आज मतदान पार पडणार असून, दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता राज्यभर मतमोजणीस सुरुवात होईल. त्यामुळे उद्यापासून दोन दिवस राज्याच्या राजकीय तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.



### कोठे-कुठे मतदान होणार?

ठाण्यातील अंबरनाथ, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा; पुण्यातील बारामती, फुरसुंगी-उरुळी देवाची; सोलापूर जिल्ह्यातील अकरा नगर, मंगळवेढा; साताऱ्यातील महाबळेश्वर, फलटण; छत्रपती संभाजीनगरातील फुलंब्री; नांदेडमधील मुखेड, धर्माबाद; लातूरमधील निलंगा, रेणापूर; हिंगोलीतील वसमत; अमरावतीतील अंजनगावसूर्जी; अकोला जिल्ह्यातील बाळापूर; यवतमाळ, वाशिम; बुलढाण्यातील देऊळगावराजा; वर्ध्यातील देवळी आणि चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथे उद्या मतदान होणार आहे.

**आयोगाने मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था, मतदान यंत्रांची तपासणी आणि कर्मचारी नियुक्त्या पूर्ण केल्या**

निवडणूक आयोगाने मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था, मतदान यंत्रांची तपासणी आणि कर्मचारी नियुक्त्या पूर्ण केल्या आहेत. मतदान अधिकाऱ्यांनी केंद्रांकडे रवाना होण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, या निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी जोरदार प्रचार करून वातावरण तापवले. मोठ्या नेत्यांच्या सभा, प्रचारयात्रा आणि घर-दारी भेटींमुळे या निवडणुकीचे राजकीय आकर्षण आणखी वाढले आहे. आता मतदारांचा कौल कोणाला मिळतो याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. दि. २१ डिसेंबरला मतमोजणी सुरू झाल्यानंतर निकाल राज्याच्या राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारा ठरेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे.

# वन विभागातील पदभरतीला गती; शासनाचा बदलाचा निर्णय

## स्पर्धा परीक्षार्थ्यांना दिलासा; भरती प्रादेशिक निवड समितीमार्फत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी राज्य शासनाने मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. वन विभागातील काही गट-क व गट-ड संवर्गातील पदभरती प्रक्रियेत बदल करून ती आता प्रादेशिक निवड समितीमार्फत करण्यात येणार असल्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे रखडलेली भरती प्रक्रिया मार्गी लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

सरळसेवा भरती प्रक्रियेंतर्गत जिल्हा निवड समितीच्या कक्षेत असलेल्या पदांची भरती अद्याप सुरू होत नसल्याने उमेदवारांत नाराजी होती. यावर उपाय म्हणून जिल्हा पातळीवरील काही पदे प्रादेशिक निवड समितीच्या कक्षेत हस्तांतरित करण्यात आली आहेत.

गट-क संवर्गातील गृहप्रमुख, माहूत, लाँचचालक, ट्रकचालक, कवायत शिक्षक, ग्रंथालय परिचर व पशू परिचर ही पदे तर गट-ड संवर्गातील शिपाई, चेनमॅन, चारा कापणारा, खलाशी, नौका तांडेल, मॉस्क लश्कर, तांडेल, पहारेकरी, देखभाल सेवक व सहायक स्वयंपाकी या पदांचा यामध्ये समावेश आहे.

या पदांसाठी पूर्वी जिल्हा, प्रादेशिक व राज्यस्तरीय समित्यांची तरतूद होती. मात्र जिल्हा समितीतून भरती प्रक्रिया सुरू झाली नसल्याने नागपूर येथील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी शासनाकडे या पदांना प्रादेशिक समितीच्या कक्षेत आणण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने २७ डिसेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करून, या पदभरती प्रक्रिया प्रादेशिक निवड समितीद्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रलंबित पदभरती लवकरच सुरू होऊन पात्र उमेदवारांना संधी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अवघी १५०० लोकसंख्या आणि २७ हजार नोंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** यवतमाळ जिल्ह्यातील एका छोट्या गावात अवघ्या तीन महिन्यांत तब्बल २७,३९८ उशिरा जन्म नोंदणी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग्रामपंचायतीच्या जन्म-मृत्यू नोंदणी प्रणालीतील या संशयास्पद वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर सायबर फसवणुकीचे संकेत मिळत असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आरोग्य विभागाने राबवलेल्या विशेष दक्षता मोहिमेदरम्यान ही बाब उघडकीस आली. राज्य सरकारच्या निर्देशानुसार सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान विलंबित नोंदींची तपासणी सुरू होती. त्यावेळी आर्णी तालुक्यातील शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या प्रणालीमध्ये हा प्रचंड आकडा आढळला.

गावाची लोकसंख्या केवळ १,५०० असल्याने इतक्या मोठ्या प्रमाणावर जन्म नोंदणी अशक्य असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी तातडीने चौकशी समिती नियुक्त केली. तपासात २७,३९७ जन्मनोंदी व ७ मृत्यू नोंदी या गावाच्या सीमेतल्या नसल्याचे उघड झाले. यानंतर हे प्रकरण तांत्रिक पडताळणीसाठी पुणे आणि दिल्ली येथील तज्ज्ञांकडे पाठवले. सीआरएस प्रणालीतील लॉगिन मुंबईशी मॅप झाल्याचे लक्षात आल्यानंतर ११ डिसेंबर रोजी मिळालेल्या अहवालात हा प्रकार सायबर फसवणुकीचा असल्याचे नमूद करण्यात आले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून जन्म-मृत्यू नोंदणीकर्त्यांना सीआरएस आयडी, पासवर्ड किंवा ओटीपी शेअर करू नये असा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे नोंदणी प्रणालीच्या सुरक्षेबाबत राज्यभरात चिंता व्यक्त केली जात आहे.

# कॉलेजियमकडून नव्या मुख्य न्यायाधीशांची शिफारस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने देशातील पाच उच्च न्यायालयांसाठी नव्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्तीची शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे. न्यायपालिका प्रशासनातील प्रलंबित पदे भरून काढणे आणि उच्च न्यायालयांचे कामकाज अधिक कार्यक्षम करणे या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मुख्य न्यायाधीशांची निवड ही सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि ज्येष्ठ न्यायाधीशांच्या कॉलेजियमद्वारे करण्यात येते. या प्रक्रियेत संबंधित उच्च न्यायालयातील ज्येष्ठता, न्यायिक अनुभव, कामगिरी, प्रशासकीय क्षमता आणि प्रादेशिक समतोल या बाबींचा सखोल विचार केला जातो. कॉलेजियमच्या शिफारशी केंद्र सरकारकडे पाठविल्यानंतर, कायदा मंत्रालयामार्फत त्याची प्रक्रिया पूर्ण होऊन राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर नियुक्ती जाहीर होते. सध्या अनेक उच्च न्यायालयांमध्ये कायमस्वरूपी मुख्य न्यायाधीश नसल्यामुळे वरिष्ठतम न्यायाधीशांकडे कार्यवाहक जबाबदारी आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रशासन, खंडपीठांची रचना, न्यायिक कामकाजाचे नियोजन आणि प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यावर मर्यादा येत असल्याचे निरीक्षण वारंवार नोंदवले जात होते. या पार्श्वभूमीवर कॉलेजियमची ही शिफारस न्यायालयीन व्यवस्थेला गती देणारी ठरणार आहे. न्यायिक सूत्रांच्या माहितीनुसार, प्रस्तावित नावांची निवड करताना केवळ ज्येष्ठता नव्हे, तर संबंधित न्यायाधीशांचा न्यायदानातील दर्जा, संवैधानिक प्रकरणांतील अनुभव आणि प्रशासकीय निर्णयक्षमता यांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच विविध राज्यांमधील उच्च न्यायालयांमध्ये संतुलन राखण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे. कॉलेजियम प्रणालीवरून गेल्या काही वर्षांत राजकीय आणि कायदेशीर पातळीवर चर्चा होत असली, तरी नियुक्त्यांच्या बाबतीत हीच पद्धत सध्या लागू आहे. केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालय यांच्यात शिफारशींवरून अनेकदा पत्रव्यवहार आणि विलंबाचे मुद्दे समोर येतात. मात्र, यावेळी शिफारशींची प्रक्रिया तुलनेने वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अंतिम फेरीत पुन्हा भारत-पाक आमनेसामने; आज रंगणार हायव्होल्टेज सामना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अंडर-१९ आशिया कप फायनल; साखळी फेरीतील विजयाची पुनरावृत्ती करण्याचे टीम इंडियाचे लक्ष्य**

**नवी दिल्ली :** अंडर-19 आशिया कप क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीत भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आज रविवार, 21 डिसेंबर रोजी आमनेसामने येत आहेत. उपांत्य फेरीत भारताने श्रीलंकेवर आणि पाकिस्तानने बांगलादेशवर सहज विजय मिळवत फायनलमध्ये प्रवेश केला. त्यामुळे चाहत्यांना पुन्हा एकदा दोन्ही संघांमधील तुफानी संघर्ष पाहण्याची संधी मिळणार आहे.

उपांत्य सामन्यात पावसाचा व्यत्यय आणि भिजलेल्या मैदानामुळे सामना उशिरा झाला. षटकसंख्या कमी करत भारत-श्रीलंका सामना 20 षटकांत झाला. श्रीलंकेने 139 धावांचे लक्ष्य दिले होते. भारताने दमदार फलंदाजी करीत फक्त दोन गडी गमावून हे आव्हान पूर्ण केले. दुसरीकडे पाकिस्तान आणि बांगलादेश यांचा सामना 27 षटकांचा करण्यात आला. बांगलादेश 121 धावांवर सर्वबाद झाला आणि पाकिस्तानने दोन गडी गमावून विजय मिळवला. आता सर्वांचे लक्ष भारत-पाकिस्तान अंतिम सामन्यावर लागले आहे. याआधी साखळी फेरीत दोन्ही संघ एकमेकांसमोर आले होते. तेव्हा भारताने 240 धावा केल्या होत्या. भारताचा डाव धोक्यात असूनही गोलंदाजांनी पाकिस्तानचा डाव 150 धावांवर गुंडाळत 90 धावांनी अप्रतिम विजय मिळवला होता. भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यांना नेहमीच राजकीय, भावनिक आणि प्रतिष्ठेचा आयाम लाभतो. त्यामुळे हा सामना केवळ जेतेपदासाठीची लढत नसून, अभिमानाचीही आहे.

## महाडीबीटीवर नोंदणीचे आदेश, पण अंमलबजावणीचा ठोस कालावधी अस्पष्ट;

# मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती केवळ कागदावरच? नोंदणीचे आदेश!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी शासन निर्णय, परिपत्रके आणि शाळांना नोंदणीचे आवाहन सातत्याने जाहीर होत असले तरी प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांपर्यंत कधी पोहोचणार, असा सवाल ऐरणीवर आला आहे. 'महाडीबीटी'वर प्रक्रिया सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून होत असताना, शाळा, पालक आणि विद्यार्थी मात्र अजूनही प्रतीक्षेतच असल्याचे चित्र आहे.**



विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्याचा शासन निर्णय झाला असला, तरी त्याची अंमलबजावणी कधी होणार, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. शाळांना महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी व माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत; मात्र प्रत्यक्षात अनेक शाळांना लॉगिन, तांत्रिक अडचणी आणि मार्गदर्शनाच्या अभावाचा सामना करावा लागत आहे. शासनाकडून दरवर्षी वेळापत्रक जाहीर होते, परिपत्रके निघतात, ई-मेल व पत्रकांद्वारे सूचना दिल्या जातात; पण प्रत्यक्षात विद्यार्थ्यांचे अर्ज कधी स्वीकारले जातील, छाननी कधी पूर्ण होईल आणि शिष्यवृत्तीची रक्कम खात्यात कधी जमा होईल, याबाबत ठोस उत्तर कुठेही दिले जात नाही. परिणामी, शाळा जबाबदारी झटकत शासनाकडे बोट दाखवतात, तर पालक प्रशासनाकडे धाव घेतात—आणि विद्यार्थी मात्र आशेवरच राहतात.

विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती हा शिक्षणाचा आधार आहे. वह्या-पुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्य यासाठी ही मदत वेळेत मिळणे अत्यावश्यक असते. मात्र शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिने उलटले तरी 'नोंदणी सुरू आहे' एवढ्याच घोषणांवर समाधान मानावे लागत आहे.

### मागास विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रतीक्षेतच

- विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्याचा शासन निर्णय झाला असला, तरी त्याची अंमलबजावणी कधी होणार, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. शाळांना महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी व माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत; मात्र प्रत्यक्षात अनेक शाळांना लॉगिन, तांत्रिक अडचणी आणि मार्गदर्शनाच्या अभावाचा सामना करावा लागत आहे.

एकीकडे "एकही पात्र विद्यार्थी वंचित राहू नये" असा दावा प्रसिद्धी पत्रकांतून केला जातो; तर दुसरीकडे अंमलबजावणीतील ढिसाळपणा, विलंब आणि अस्पष्ट वेळापत्रकामुळे अनेक पात्र विद्यार्थी प्रत्यक्ष लाभापासून दूर राहण्याची भीती व्यक्त करत आहेत. त्यामुळे केवळ शासन निर्णय जाहीर करून हात झटकण्याऐवजी, स्पष्ट वेळापत्रक, तांत्रिक अडचणींचे निराकरण आणि वेळेत निधी वितरणाची हमी देण्याची गरज असल्याची मागणी पालक, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांकडून होत आहे.

## विशेष संपादकीय

# इतिहास नाकारणारे राष्ट्र स्वत:लाच नाकारते

**इतिहास हा केवळ भूतकाळाचा दस्तऐवज नसतो; तो राष्ट्रांच्या स्मृतीचा आणि दिशादर्शक विवेकाचा पाया असतो. जेव्हा निवडणूक राजकारणासाठी त्या स्मृतीवर धूळ फेकली जाते, तेव्हा राष्ट्रे वर्तमानात भरकटतात आणि भविष्य धोक्यात आणतात. बांगलादेशात सध्या जे भारतविरोधी वातावरण निर्माण केले जात आहे, ते याच आत्मविस्मरणाचे लक्षण आहे. ढाक्यातील भारतीय उच्चायुक्तालयावर काढलेला मोर्चा, भारतविरोधी घोषणा आणि बांगलादेश मुक्ती संग्रामातील भारताच्या भूमिकेवरच शंका उपस्थित करण्याचे प्रयत्न हे सारे एका क्षणिक संतापाचे नव्हे, तर जाणीवपूर्वक पोसलेल्या राजकीय विस्मृतीचे परिणाम आहेत.**

१९४७ मध्ये भारताची फाळणी झाली, तेव्हा पाकिस्तान दोन भागांत निर्माण झाला. पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान (आताचा बांगलादेश). दोन्ही भागांमध्ये हजारो किलोमीटरचे अंतर, वेगळी भाषा, वेगळी संस्कृती आणि वेगळी सामाजिक रचना असूनही 'धर्म' हा एकमेव धागा मानून राष्ट्र उभे केले गेले. त्याचे दुष्परिणाम लवकरच दिसू लागले. उर्दू लादण्याचा प्रयत्न, बंगाली भाषेचा अपमान आणि आर्थिक शोषण यामुळे पूर्व पाकिस्तानमध्ये असंतोष पेटत गेला. १९५२ चा भाषा आंदोलनातील रक्तसाक्षीचा इतिहास आजही बांगलादेशच्या स्मृतीत कोरलेला आहे. १९७१ मध्ये हा असंतोष स्फोटक पातळीवर पोहोचला. पाकिस्तानी लष्कराने 'ऑपरेशन सर्चलाइट'अंतर्गत पूर्व पाकिस्तानमध्ये अमानुष अत्याचार केले. लाखो बंगाली नागरिक मारले गेले, महिलांवर अत्याचार झाले आणि सुमारे एक कोटी निर्वासित भारतात आले. त्या वेळी भारतासमोर प्रश्न केवळ परराष्ट्र धोरणाचा नव्हता, तर मानवीयतेचा होता. इंदिरा गांधींनी आंतरराष्ट्रीय दबाव झुगारून दिला, तर फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराने निर्णायक कारवाई केली. १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाक्यात पाकिस्तानी लष्कराने शरणागती पत्करली आणि बांगलादेश जन्माला आला. हा इतिहास आहे— मतप्रवाह नाही. त्यानंतरच्या दशकांत बांगलादेशने अनेक चढ-उतार पाहिले. शेख मुजीबुर रहमान यांची हत्या, लष्करी राजवटी, झिया-हसीना संघर्ष आणि कट्टरवादाचा उदय या सगळ्या प्रवासात भारत-बांगलादेश संबंध कधी उबदार तर कधी तणावपूर्ण राहिले. मात्र एक गोष्ट स्पष्ट होती. कट्टर इस्लामी शक्ती आणि जिहादी गट भारतविरोधी भूमिकेचे वाहक होते. शेख हसीना यांच्या सत्ताकाळात या शक्तींना लगाम घातला गेला. याच कारणामुळे त्या गटांचा रोष आज पुन्हा उफाळून येताना दिसतो. हसीना यांच्यावर 'भारताच्या सांगण्यावरून राज्य केल्याचा' आरोप करून, त्यांच्या कथित दडपशाहीविरोधात जनमत एकत्र करण्यासाठी भारताला लक्ष्य केले जात आहे. इतिहासात हे नवीन नाही. १९६०-७० च्या दशकातही पाकिस्तानने आपल्या अंतर्गत अपयशांचे खापर भारतावरच फोडले होते. आज बांगलादेशातील काही नेतेही तोच मार्ग अवलंबत आहेत. 'आपण आधी मुसलमान आहोत, नंतर बंगाली' ही ओळख पुढे रेटली जात आहे, जी बांगलादेशाच्या जन्माच्या मूळ तत्त्वालाच छेद देते. चीनचा संदर्भ येथे अपरिहार्य ठरतो. चीनशी जवळीक दाखवणे हा दक्षिण आशियातील अनेक देशांचा निवडणुकीचा शॉर्टकट राहिला आहे. श्रीलंकेत हंबनटोटा बंदर, नेपाळमधील कर्जजाळे आणि मालदीवमधील 'इंडिया आउट' मोहिमेचा अनुभव फार जुना नाही. मालदीवमध्ये निवडणुकीत भारतविरोधी घोषणा देणारे मोहम्मद मोइज्जू सत्तेवर येताच वास्तवाशी सामना करत भारताकडेच परतले, हाही इतिहासच आहे. बांगला देशातही हेच घडेल, अशी शक्यता नाकारता येत नाही. निवडणुकीपुरते उफाळलेले भारतविरोधी सूर दीर्घकाळ टिकत नाहीत. भूगोल, व्यापार, ऊर्जा, पाणीवाटप आणि सुरक्षा या प्रश्नांवर भारताशिवाय पर्याय नसतो, हे शेवटी लक्षात येते. भारतानेही या सगळ्याकडे अति भावनिक न होता संयमाने पाहणे गरजेचे आहे. इतिहासाची आठवण करून देणे हा गर्व नसून वस्तुस्थिती आहे. इतिहास नाकारणे ही राजकीय सोय असू शकते; पण त्याची किंमत राष्ट्रांनाच मोजावी लागते. बांगलादेशने हा धडा विसरू नये—कारण राष्ट्रे स्मृतीवर उभी राहतात, विस्मरणावर नाहीत.

■ संपादक, दै. राज्य लोकतंत्र, पुणे

# आकड्यांची झिंग आणि नावफलकांचा विकास!

■ डॉ. अशोक बालगुडे

**पुणे : विकासाचे मूल्यमापन आज कामांच्या गुणवत्तेपेक्षा नावांच्या आकर्षणावर आणि आकड्यांच्या प्रचंडतेवर अधिक केले जात आहे. योजनांची नावे बदलणे, शहरांची ओळख नव्याने मांडणे आणि अर्थसंकल्पात कोटी-अब्जांची तरतूद जाहीर करणे यालाच प्रगतीचे निर्देशक मानले जाऊ लागले आहेत. मात्र, संसदेत सादर होणारी आकडेवारी, निधी आयोगाचे अहवाल आणि मनरेगासारख्या योजनांचा जमिनीवरचा अनुभव यांची तुलना केली असता, घोषणांमधील आश्वासन आणि प्रत्यक्ष परिणाम यांत लक्षणीय अंतर दिसून येते? या पार्श्वभूमीवर विकास म्हणजे नेमके काय, निधीचा प्रवास कसा घडतो आणि उत्तरदायित्वाची चौकट कुठे विस्कटते, हे प्रश्न शांतपणे पण ठामपणे विचारण्याची गरज निर्माण झाली आहे.**



राज्यकर्त्यांची झिंग ओळखायची असेल, तर त्यांच्या भाषणातील आकड्यांकडे पाहावे. कोटी, अब्ज, लाखो लाभार्थी, हजारो प्रकल्प—हे आकडे इतक्या आत्मविश्वासाने मांडले जातात की विकास जणू कागदावरच पूर्ण झाला आहे, असा भास निर्माण होतो. पण त्या आकड्यांच्या आड एक साधा प्रश्न कायम उरतो—या सगळ्यात सामान्य माणसाच्या आयुष्यात नेमके काय बदलले? आज विकासाची व्याख्या हळूहळू कामांपेक्षा नावांभोवती फिरू लागली आहे. योजना तीच, रचना तीच, उद्दिष्टे तीच; बदलते ते फक्त नाव. शहर तसेच राहते, प्रश्न तसेच राहतात; बदलतो तो फक्त नामफलक. उद्घाटन, लोकार्पण आणि फलकांच्या गर्दीत विकासाचा अर्थच हरवून बसतो. विकास म्हणजे दिसणे, झळकणे आणि मोजता येणे, असा एक धोकादायक समज पक्का केला जात आहे.

स्वातंत्र्यानंतर शहरांची नावे बदलली गेली, तेव्हा त्या बदलामागे वसाहतवादी मानसिकतेपासून मुक्त होण्याचा विचार होता. बॉम्बेचे मुंबई होणे किंवा मद्रासचे चेन्नई होणे हा सांस्कृतिक स्वाभिमानाचा प्रश्न होता. त्या बदलांनी रोजच्या आयुष्यात त्वरित फरक पडला नाही, पण त्यामागे वैचारिक भूमिका होती. आज मात्र नामांतर हा विकासाचा पर्याय बनवला जात आहे. नाव बदलले म्हणजे काम झाले, असा सोयीस्कर भ्रम निर्माण केला जातो. हीच प्रवृत्ती योजनांच्या बाबतीत अधिक ठळक दिसते. ग्रामीण रोजगार, घरकुल, आरोग्य, पोषण, पाणी या सगळ्या क्षेत्रांत जुन्याच योजनांचे नवे अवतार सादर केले जातात. नावात एखाद्या नेत्याचे नाव जोडले की योजना जणू नव्याने जन्माला येते. पण लाभार्थ्यांच्या खात्यात येणारी रक्कम, कामाची गुणवत्ता किंवा सेवा मिळण्याची वेळ यांत काही फरक पडतो का, याची उत्तरे मात्र गोंधळात टाकणारी असतात. यात जनतेच्या भावनांशी खेळण्याचा भाग स्पष्ट आहे.

भावनिक नावांमुळे योजना अपयशी ठरली तरी प्रश्न विचारणे कठीण होते. नावावर टीका म्हणजे त्या विचारसरणीवर हल्ला, अशी समजूत पसरवली जाते. लोकशाहीत ही धोक्याची घंटा आहे. कारण लोकशाहीत योजना तपासण्यासाठी असतात, पूजेसाठी नव्हे. आकडेवारी हा या सगळ्या व्यवस्थेचा कणा आहे. संसदेत मांडले जाणारे आकडे पाहिले, तर विकासाने देश झपाट्याने पुढे जात असल्याचे चित्र उभे राहते. निधी आयोगाच्या अहवालांतही योजनांसाठी मोठ्या तरतुदी दिसतात. पण त्याच अहवालांत एक वास्तव वारंवार समोर येते—तरतूद, वितरण आणि प्रत्यक्ष परिणाम यांत मोठी दरी आहे. पैसा मंजूर होतो, पण वेळेवर खर्च होत नाही; खर्च होतो, पण अपेक्षित परिणाम दिसत नाहीत. मनरेगाचा अनुभव याचे ठळक उदाहरण आहे. ही योजना रचली गेली, तेव्हा ती केवळ रोजगार देणारी नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणारी सामाजिक सुरक्षा म्हणून पाहिली गेली. जी. रामजी यांच्यासारख्या अभ्यासकांनी मनरेगाचे महत्त्व केवळ रोजगारापुरते न ठेवता, ग्रामीण समाजाच्या सन्मानाशी जोडले होते. संसदेत आजही कोट्यवधी मनुष्य-दिवसांचे आकडे सादर केले जातात. पण जमिनीवर वास्तव वेगळे आहे— कामाची मागणी असूनही निधी अपुरा, मजुरी उशिरा आणि कामांचे मोजमाप कागदावरच जास्त. निधी आयोग वारंवार सांगतो की स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार आणि निधी हवा. पण प्रत्यक्षात निधी योजनांद्वारे वरून खाली येतो.

ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका केवळ अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा बनतात. निर्णय वर होतात, अटी वरून ठरतात आणि अपयशाची जबाबदारी मात्र खाली ढकलली जाते. त्यामुळे निधी गेला कुठे, हा प्रश्न विचारला की उत्तर कुणाकडेच नसते. डिजिटल युगात पारदर्शकतेचे मोठे दावे केले जातात. थेट लाभ हस्तांतरण, ऑनलाइन डॅशबोर्ड आणि रिअल-टाइम डेटा यामुळे भ्रष्टाचार संपल्याचा दावा केला जातो. प्रत्यक्षात भ्रष्टाचार संपलेला नाही; तो फक्त अधिक सुसंस्कृत आणि अदृश्य झाला आहे. कागदोपत्री सगळे स्वच्छ दिसते; पण निविदा प्रक्रिया, प्राधान्यक्रम आणि निर्णयप्रक्रिया अजूनही सामान्य नागरिकाच्या आवाक्याबाहेरच राहते. शहरांचा विकास पाहिला तर ही विसंगती आणखी ठळक होते. स्मार्ट सिटी, अमृत योजना, मेट्रो प्रकल्प—या सगळ्यांच्या उद्घाटनांत विकासाचा उत्सव दिसतो. पण त्याच शहरांत पाणीटंचाई, प्रदूषण, वाहतूककोंडी आणि परवडणाऱ्या घरांचा अभाव कायम आहे. भिंती रंगवल्या जातात, चौक सुशोभित होतात; पण सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि वाहतूक यांसारखे मूलभूत प्रश्न तस्सेच राहतात. राजकीय उपरोध इथे अपरिहार्य ठरतो.

कारण राज्यकर्ते आकडे ज्या आत्मविश्वासाने मांडतात, त्याच आत्मविश्वासाने प्रश्न विचारणाऱ्यांना 'नकारात्मक' ठरवतात. योजना चालली नाही, तर दोष यंत्रणेचा; निधी पोहोचला नाही, तर दोष लाभार्थ्यांचा. धोरणात्मक निर्णयांवर प्रश्न विचारणे मात्र गैरसमज निर्माण करणारे ठरते. ही झिंग लोकशाहीसाठी घातक आहे. इतिहास सतत इशारा देतो. 'गरिबी हटाव'पासून ते आजच्या 'विकासाच्या नव्या मॉडेल'पर्यंत घोषणांची परंपरा अखंड चालू आहे. काही योजनांनी खरे बदल घडवले, हे नाकारता येणार नाही. पण अनेक वेळा योजनांचा उपयोग प्रश्न सोडवण्यापेक्षा आकडे फुगवण्यासाठी झाला. नियंत्रक व महालेखापाल आणि संसदीय समित्यांचे अहवाल हे वारंवार अधोरेखित करतात. म्हणूनच आज प्रश्न नावांचा नाही, आकड्यांचाही नाही. प्रश्न आहे

### विकास फलकांवर नाही, माणसांच्या आयुष्यात घडावा

उत्तरदायित्वाचा. विकास म्हणजे किती कोटी खर्च केले, हे नव्हे; तर त्या खर्चामुळे किती आयुष्ये बदलली, हा खरा मापदंड आहे. शेतकऱ्याच्या हातात वेळेवर पैसा आला का, मजुराला वेळेवर मजुरी मिळाली का, रुग्णाला परवडणारी सेवा मिळाली का—हे प्रश्न अस्वस्थ करणारे आहेत, म्हणूनच ते टाळले जातात. राज्यकर्त्यांची झिंग उतरवायची असेल, तर आकड्यांच्या मागे जाऊन परिणाम विचारावे लागतील. नावफलकांच्या मागे जाऊन वास्तव पाहावे लागेल. लोकशाहीत भावनांना स्थान आहे; पण धोरणांना विवेक हवा. अन्यथा विकास हा भाषणांतून धावेल आणि जमिनीवर मात्र थकून बसेल. विकास जर खरोखरच घडायचा असेल, तर तो फलकांवर नव्हे, तर माणसांच्या आयुष्यात दिसायला हवा. तो दिसू लागला, तर आकड्यांना अर्थ उरेल. अन्यथा हे आकडे, ही नावे आणि हे फलक—सगळेच इतिहासात केवळ राजकीय झिंगीची नोंद म्हणून उरतील.

# अनधिकृत फ्लेक्सचा मारा; आचारसंहिता कागदावरच?

## प्रशासन कोणासाठी काम करत आहे : नागरिकांचा संतप्त सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू होऊनही शहरभर अनधिकृत व विनापरवाना फ्लेक्स तशाच अवस्थेत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. "प्रशासन नेमके कोणासाठी काम करत आहे?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात असून, आचारसंहिता धाब्यावर बसविल्याचा आरोप होत आहे.

वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील प्रभाग क्र.४१ (पूर्वीचा प्रभाग क्र.२६) मध्ये महंमदवाडी गाव न्याति चौक ते सय्यदनगर रेल्वे क्रॉसिंगपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर फ्लेक्स लावलेले असल्याचे चित्र आहे. निवडणूक आयोगाने आदर्श



आचारसंहिता लागू केल्यानंतरही हे फ्लेक्स हटविण्यात न आल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महापालिका आयुक्त रामकिशोर नवल यांनी विनापरवाना व बेकायदेशीर फ्लेक्सवर तातडीने कारवाई करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे "आचारसंहितेचे नियम फक्त कागदावरच आहेत का?" असा सवाल ससाणेनगर-हडपसर नागरिक कृती समितीने उपस्थित केला आहे. स्थानिक नागरिक मोहनलाल बलाई यांनी वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त अमोल पवार यांच्यावर थेट बोट दाखवत, "या भागातील बेकायदेशीर फ्लेक्स प्रशासनाला दिसत नाहीत का?" असा प्रश्न उपस्थित केला. तसेच शहरातील पंधरा क्षेत्रीय कार्यालयांतील सहाय्यक आयुक्त आणि आकाशचिन्ह विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कारवाई करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

वर्षभर शहरभर बेकायदेशीर फ्लेक्समुळे शहर विद्रूप होत असताना, दोन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या स्पष्ट सूचनांकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. आचारसंहितेचे पालन होत आहे की नाही, याची जबाबदारी असलेल्या महापालिका प्रशासनाकडून हलगर्जीपणा होत असल्याचे प्राथमिक स्वरूपात दिसून येत आहे, असा संतप्त सवाल हडपसर-ससाणेनगर नागरी कृती समितीचे अर्जुन सातव, रणजित रासकर, मोहन सातव व प्रमय बिराजदार यांनी महापालिकेला विचारला आहे.

# लोकशाहीचा उत्सव– मतदान करून दाखवा आपली ताकद : डॉ. बोराटे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** फुरसुंगी देवाची आणि भेकराईनगर भागातील नागरिकांनी मतदान करून आपली ताकद दाखवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे आवाहन बोराटे हॉस्पिटलचे डॉ. मंगेश बोराटे यांनी केले. "मतदानाचा हक्क बजावणे ही केवळ जबाबदारी नाही, तर भागातील नागरी विकासाची संधी देखील आहे. योग्य उमेदवार निवडल्यास येत्या पाच वर्षांत स्थानिक समस्या सोडवता येतील," असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बोराटे म्हणाले की, "लोकशाही ही लोकांनी लोकांसाठी चालवलेली सत्ता आहे. मतदार हा त्या लोकशाहीचा राजा आहे, पण त्याचा हक्क फक्त एका दिवस – मतदानाच्या दिवशी – लागू होतो. म्हणून नागरिकांनी सजगपणे मतदान करावे."

बोराटे हॉस्पिटलने मागील १४ वर्षांपासून फुरसुंगी परिसरातील नागरिकांना अस्थिरोग, फ्रॅक्चर, अपघात यासारख्या वैद्यकीय सेवांमध्ये मदत केली आहे. या पार्श्वभूमीवर हॉस्पिटलने पुढील ७–१० दिवसांत मतदानाची निशाणी दाखवणाऱ्या नागरिकांसाठी तपासणी आणि उपचारांमध्ये विशेष सवलत देण्याची घोषणा केली आहे. "ही सवलत वैद्यकीय कारणासाठी नाही, तर लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी आहे," असेही डॉ. बोराटे म्हणाले.

हॉस्पिटलचे हे उपक्रम नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यास मोठे सहाय्यक ठरणार आहेत, तर आरोग्य तपासणीसह सवलत मिळाल्याने लोकांना दोन्ही बाबतीत लाभ होणार आहे.

# आयुक्तांच्या बंगल्यात 'गहाळ' काहीच नव्हते!

## चौकशी अहवालात सर्व साहित्य सुरक्षित




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका आयुक्तांच्या निवासस्थानातून जुने आणि किमती साहित्य गायब झाल्याच्या चर्चेला अखेर स्पष्ट उत्तर मिळाले आहे. शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्या चौकशी अहवालानुसार बंगल्यातील सर्व वस्तू सुरक्षित असून कोणतीही वस्तू गायब नाही, असे अहवाल आयुक्तांना सादर करण्यात आले.

पुणे महापालिका आयुक्तांच्या मॉडेल कॉलनी येथील बंगल्यातील वस्तूंच्या गहाळ झाल्याच्या चर्चेने शहरात खळबळ उडवली होती. जून २०२५ मध्ये महापालिका निवृत्त झालेले डॉ. राजेंद्र भोसले यांनी बंगला सोडल्यानंतर झुंबर, ऐतिहासिक चित्रे, वातानुकूल यंत्रणा, मोठे एलईडी टीव्ही, कॉफी मेकर, वॉकीटॉकी सेट, वॉटर प्युरिफायर आणि पितळी व कांस्य धातूचे दिवे गायब असल्याच्या चर्चा शहरात पसरल्या होत्या.

या चर्चेनंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांची चौकशी समिती नेमली. समितीने महापालिकेच्या भवन रचना विभाग, विद्युत विभाग, सुरक्षा विभाग, मुख्य उद्यान अधीक्षक, मध्यवर्ती भांडार विभाग आणि घोले रोड-शिवाजीनगर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडून सविस्तर माहिती मागवली. चौकशी अहवालात स्पष्ट झाले की, बंगल्यातील सर्व वस्तू जागेवर आहेत. कोणतीही साहित्य वस्तू गायब नाही. यामुळे जुन्या आणि किमती वस्तू चोरीच्या चर्चेला पूर्णविराम लागला आहे. या घटनेमुळे शहरातील स्वयंसेवी संस्था आणि काही राजकीय पक्षांनी आधीच प्रतिक्रिया दर्शवली होती. त्यांनी प्रशासनाकडून चौकशीची मागणी केली होती. आता चौकशी अहवाल सार्वजनिक झाल्याने या चर्चेला बंदिस्त उत्तर मिळाले आहे.

सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर म्हणाले, "हा अहवालच हास्यास्पद आहे. केवळ 'सर्व वस्तू जागेवर आहेत' असे लिहून प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली आहे. जर सगळ्या वस्तू जागेवर होत्या, तर सहा तासांत तपासणी आणि सहा दिवसांत अहवाल देता आला असता. मग सहा महिने का लागले, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे,"

# 'घरात साथ नाही, पण बारामतीत तुमचा विश्वास'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामतीकरांसमोर घरातील विरोधकांवर खडूस टीका करताना जनतेच्या विश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. बारामती नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारात अजित पवार यांनी भावनिक भाषणात कौटुंबिक वादाचा उल्लेख करत, "तुम्ही मला साथ देता, पण घरातील लोक सुद्धा साथ देत नाहीत. तुमच्या विश्वासामुळे मी झोकून देऊन काम करतो," असे सांगितले.

अजित पवार म्हणाले की, "निवडणूक आली की बारामतीत येतात, बाकी पाच वर्ष कुठे असतात? बाहेरची लोक येतील, बोलतील; पण त्यांना बारामतीचे काही देणेघेणे नाही. त्यांच्या नादी लागू नका, फक्त माझा नाद करा." बारामतीच्या विकास प्रकल्पांमध्ये "५५ कोटींचे नर्सिंग कॉलेज, १० एकर कॅन्सर हॉस्पिटल, १२ कोटींचे सायन्स पार्क, IIT–IIM मिळवण्याचा प्रयत्न आणि सिंगापूरसारखी स्मार्ट सिटी – हे सर्व फक्त माझ्या नेतृत्वाखाली शक्य आहे." नगरपरिषदेत सर्व ४१ जागांवर जनतेचे समर्थन मागत त्यांनी सांगितले, "मी शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित कार्यकर्ता आहे; जात-धर्माचा विचार कधी केला नाही. माझ्या वडिलधाऱ्यांची तीच शिकवण आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

## श्री शिव छत्रपती महाविद्यालयात वाङ्‌मय मंडळाचे उद्घाटन

**बनकरफाटा :** श्री शिव छत्रपती कॉलेजमध्ये वाङ्‌मय मंडळाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमांतर्गत साहित्य व मराठीतील प्रवासवर्णन लेखनात स्त्रियांचे योगदान या विषयावर डॉ. मनिषा बाळासाहेब कवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही.बी. कुलकर्णी, ज्युनिअर समन्वयक प्रा. पी.एस. लोढा तसेच विभाग प्रमुख व पर्यवेक्षक उपस्थित होते. प्रा. आर.सी. माने यांनी प्रास्ताविक केले, प्रा. व्ही. एच. सावंत यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. पी.एस. मनसुख यांनी आभार मानले.

# १५ वर्षांच्या गर्भवतीच्या वयाचा बनावट जन्मदाखला

## ससूनमध्ये धक्कादायक बनाव; काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** कायदा, वैद्यकीय यंत्रणा आणि पोलीस तपास यांना चकवा देत अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार लपवण्याचा गंभीर प्रकार ससून सर्वोपचार रुग्णालयात उघडकीस आला आहे. केवळ १५ वर्षांच्या गर्भवती मुलीला सज्ञान असल्याचे भासवण्यासाठी नागपूर महापालिकेच्या नावाने बनावट जन्मदाखला तयार करून डॉक्टरांची फसवणूक करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी २५ वर्षीय तरुण आणि मुलीच्या आईविरुद्ध काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले की, आरोपी तरुणाचे अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध होते. मुलगी अल्पवयीन असतानाच तिच्यावर अत्याचार झाला आणि ती गर्भवती राहिली.

ही बाब उघडकीस येऊ नये, तसेच पोक्सो कायद्याच्या कचाट्यातून सुटका व्हावी, यासाठी आरोपींनी मुलगी सज्ञान असल्याचा बनावट जन्मदाखला तयार केला. हा बनावट दस्तऐवज नागपूर महापालिकेच्या नावाने तयार करून मुलीची आई आणि आरोपी तरुणाने ससून रुग्णालयात सादर केला. त्यानंतर वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण करून मुलीची प्रसूती करण्यात आली. मात्र, कागदपत्रांच्या पडताळणीत विसंगती आढळल्यानंतर प्रकरण उघड झाले. पोलिसांनी आरोपींविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) तसेच फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याचे कलम लावले असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे अल्पवयीन मुलींच्या संरक्षणाबाबत तसेच वैद्यकीय संस्थांमधील कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# जादुई आकडा ८३ गाठण्यासाठी राजकीय रणसंधी

## पुणे महापालिका निवडणुकीचे राजकीय वातावरण तापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीसाठी १६५ जागांपैकी बहुमताचा आकडा ८३ गाठण्यासाठी सर्वच पक्ष जोरदार तयारीत आहेत. उमेदवारी, युती-फोडाफोडी आणि राजकीय बंडखोरीतून शहरातील राजकारण तापलेल्या वातावरणात आहे.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी सत्ताधारी भाजपने 'मिशन १२५' जाहीर करून स्पष्ट संदेश दिला आहे की फक्त बहुमताचा आकडा ८३ नव्हे, तर संपूर्ण शहरावर आपले वर्चस्व प्रस्थापित करायचे आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात युती झाली आहे, परंतु महायुतीत मनसे



सामावून घेतली जाईल की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष आघाडीत राहणार की नाही, हेही अजून अनिश्चित आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष आपल्या रणनीतीत गुप्तपणे काम करत आहे.

सध्या उमेदवार शोधमोहीम, मुलाखती, 'एबी फॉर्म' वितरण यांसह सर्व तयारी जोरात सुरू आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास २३ डिसेंबरपासून सुरुवात होईल, तर प्रमुख पक्षांचे उमेदवार २९-३० डिसेंबरला निश्चित होतील. या काळात इच्छुक उमेदवार राजकीय नेत्यांच्या दरवाजांवर धावधाव करत आहेत.

गेल्या निवडणुकीत काँग्रेसने शहरावर मोठा दबदबा प्रस्थापित केला होता, परंतु या वेळी भाजपनेही आपली ताकद स्पष्टपणे दाखवण्याची तयारी केली आहे. मागील ९७ नगरसेवकांची संख्या यावेळी १२५ करण्याचे लक्ष्य भाजपने निश्चित केले आहे. त्यासाठी राजकीय नैतिकता बाजूला ठेवून इच्छुकांना प्रवेश देण्यास भाजप सज्ज आहे.

महाविकास आघाडी करायचे ठरले असले, तरी मनसेचा समावेश होईल की नाही, हे अद्याप अस्पष्ट आहे. युती-फोडाफोडीच्या या गोंधळात पुण्यातील राजकारण तापलेल्या वातावरणात आहे. प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षावर नजर ठेवून, एकमेकांचे हालचाल तपासत आहे.

पुढील काही दिवसात या 'राजकीय संशयकल्लोळात' अनेक गुपितच निर्णय, तडाखेबाज रणनीती आणि युती-फोडाफोडी पाहायला मिळणार आहेत. ८३ हा जादुई आकडा पार करण्यासाठी कोणत्या पक्षाची रणनीती काम करेल, हे आता शहरवासीयांसाठी सर्वात मोठे प्रश्नचिन्ह आहे. संपूर्ण पुणेच आता पाहत आहे की, राजकारणातील नैतिकतेला बाजूला ठेवून सत्ता हाती घेण्याचा कोणता पक्ष सर्वात चपळ राहील आणि बहुमताचा आकडा ८३ कसा गाठला जाईल.

# दिव्यांग प्रमाणपत्राचा फसवा खेळ! ३८ शिक्षक अडकले जाळ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्हा परिषदेतील शिक्षकांचा दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर अखेर उघडकीस आला आहे. बदलीसाठी सवलतीचा गैरफायदा घेतल्याचे ४६ नोटीस बजावलेल्या शिक्षकांपैकी ३८ शिक्षकांनी मान्य केले आहे. आता त्यांची बदली होणार असून, त्यांच्यावर कडक विभागीय चौकशीही होणार आहे.

जिल्ह्यातील ४०० हून अधिक शिक्षकांवर तक्रारी येताच मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी १७६ शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची आरोग्य उपसंचालकांमार्फत पडताळणी केली. तपासात संबंधित शिक्षकांचे अपंगत्व ४० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे निष्पन्न झाले. नंतर ४६ शिक्षकांना नोटीस बजावून खुलासे मागवले गेले. प्राप्त झालेल्या ४५ खुलाशांपैकी ३८ जणांनी बदलीसाठी सवलतीचा गैरफायदा घेतल्याचे कबूल केले, तर ४ शिक्षकांनी नियुक्तीपासूनच लाभ घेतल्याचे समोर आले. दुर्दैवाने या प्रक्रियेदरम्यान पुरंदरमधील एका शिक्षकाचा मृत्यू झाला.

दरम्यान, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईक यांनी सांगितले की, दोषी ठरलेले शिक्षक त्वरित बदलीसाठी फिरवले जातील आणि त्यांच्या विरोधात कडक विभागीय चौकशी केली जाईल. या प्रकरणामुळे शिक्षक वर्गातील जबाबदारी आणि प्रमाणपत्रांच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## सारांश वृत्त

### चोरीचा मुद्देमाल फिर्यादीस परत

**नकरफाटा :** ओतूर येथील घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल ओतूर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे हस्तगत करून फिर्यादीस सहीसलामत परत केला आहे. १२ ऑगस्ट रोजी पहाटे ब्राम्हणवाडा रोडवरील संकल्प पॅराडाईजमधील मंदाकिनी लक्ष्मण डुंबरे यांच्या फ्लॅटमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून मंगळसूत्र, मोबाईल व पितळेची गायीची मूर्ती चोरी केली होती. पोलिसांनी आरोपी अक्षय दिलीप घादवड (वय १९) यास अटक करून त्याच्याकडून सुमारे ३ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेले ३ तोळे ८ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, ओपो मोबाईल व पितळेची गायीची मूर्ती १७ डिसेंबर रोजी फिर्यादीस परत करण्यात आली. पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळशिराम भवारी, नरेंद्र गोराणे, देविदास खेडकर, विलास कोंढावळे व पोलीस शिपाई ज्योतीराम पवार यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### एकाच रात्री दोन वाहनांचे टायर चोरीला


**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथे एकाच रात्री दोन वेगवेगळ्या ठिकाणी उभ्या असलेल्या दोन वाहनांचे टायर चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चव्हाण कॉम्प्लेक्ससमोर पांडुरंग म्हस्के यांची पिकअप तर बजरंगवाडी येथे दिनेश भुजबळ यांचा टेम्पो रात्री उभा होता. सकाळी दोन्ही वाहनांचे प्रत्येकी दोन टायर स्टेपनीसह चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. पुढील तपास पोलीस हवालदार हनुमंत गिरमकर व गणेश करपे करीत आहेत.

---

### कडबनवाडीच्या गवताळ माळरानावर 'शबल ससाणा'चे संमेलन

# युरोपचा दुर्मिळ पाहुणा इंदापूरात दाखल!

■ डॉ. अशोक बालगुडे



**पुणे : युरोप आणि मध्य आशियातून दर हिवाळ्यात भारतात येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांच्या आगमनाने पुन्हा एकदा भिगवण-कडबनवाडी (ता. इंदापूर) गवताळ प्रदेशावर संमेलन भरले आहे. पक्षी निरीक्षकांसाठी आणि नागरिकांसाठी हा काळ फक्त नैसर्गिक सैर नाही, तर जीवनातल्या सूक्ष्म सौंदर्याचा साक्षात्कार आहे. या हिवाळ्यात कडबनवाडीच्या मोकळ्या गवताळ माळरानावर दिसलेल्या दुर्मिळ 'शबल ससाणा'मुळे पक्षी निरीक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**

पूर्व युरोप आणि मध्य आशियातील प्रजननभूमी असलेल्या शबल ससाण्याचा भारतातला हिवाळी प्रवास प्रत्येक पक्षीप्रेमी आणि अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मादी शबल ससाण्याची तपकिरी छटा आणि नराची फिकट करडी रंगाची जुळवाजुळवी पाहताना निसर्गप्रेमी मन भरून जातात. विशेष म्हणजे, जागतिक निसर्ग संरक्षण संघटनेच्या अहवालानुसार ही प्रजाती 'संकरग्रस्त' म्हणून गणली जाते, कारण त्यांच्या नैसर्गिक अधिवासात मानवी हस्तक्षेप, शेतीतील रासायनिक फवारण्या आणि गवताळ प्रदेशांचे घटते क्षेत्रफळ यामुळे त्यांची संख्या कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर कडबनवाडी येथे त्यांचे दर्शन ही जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक घटना मानली जाते.

पक्षी निरीक्षक विशाल तोरडे म्हणाले की, "भिगवण-कडबनवाडी परिसरातील मोकळे गवताळ क्षेत्र, लहान सस्तन प्राणी आणि अन्नसाखळी उपलब्ध असल्यामुळे शिकारी पक्ष्यांसाठी हा परिसर खूप अनुकूल ठरत आहे. शबल ससाण्यांसह इतर स्थलांतरित शिकारी पक्ष्यांचा येणे म्हणजे निसर्गाची सुंदर योजना आणि जीवनशक्तीचा एक अप्रतिम दर्शन आहे." दुर्मिळ ससाण्याचे दर्शन घेतले आणि त्याचे व्हिडीओ चित्रीत केले आहेत. त्यांच्या या अनुभवानंतर स्थानिक नागरिकांमध्येही निसर्गाशी नवे नाते निर्माण झाले आहे. काहींच्या मते, अशा दुर्मिळ पाहुण्यांचे आगमन म्हणजे आपल्या परिसरातील पर्यावरण आणि जैवविविधतेचे प्रत्यक्ष साक्षात्कार आहे.

या क्षेत्रातील स्थलांतरित शिकारी पक्ष्यांमध्ये अमूर ससाणा, सरडमार भोवत्या, नेपाळी गरुड आणि मोठ्या ठिपक्यांचा गरुड यांचा समावेश आहे. प्रत्येक पक्ष्याची उपस्थिति त्या परिसरातील गवताळ आणि अर्धजलचर अधिवासाच्या आरोग्याची साक्ष देते. या पक्ष्यांचे निरीक्षण करताना स्थानिक नागरिक आणि पक्षी निरीक्षक एकत्र येऊन निसर्गसौंदर्याची अनुभूती घेत आहेत. पक्षी निरीक्षकांच्या म्हणण्यानुसार, या आगमनामुळे पर्यावरणीय संवेदनशीलता वाढते आणि नागरिकांमध्ये निसर्गाचे रक्षण करण्याची भावना उत्पन्न होते.

यावर्षी उजनी धरणातील पाण्याची पातळी पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे फ्लेमिंगो पक्ष्यांचे आगमन काहीसे विलंबित झाले आहे. मात्र, त्याच कालावधीत इंदापूर तालुक्यात स्थलांतरित शिकारी पक्ष्यांचे दर्शन होत असल्याने पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी हा काळ पर्वणीच्या समान ठरला आहे. पाण्याची पातळी जास्त असल्यामुळे उथळ पाणवठे आणि चिखलपट्ट्या उशिरा उपलब्ध होत आहेत, आणि त्यामुळे पक्ष्यांचे आहार व अधिवास यथासांग राहतात. स्थानिक नागरिक रामदास माने म्हणतात, "आमच्या गवताळ प्रदेशात युरोप आणि आशियातून येणाऱ्या दुर्मिळ पाहुण्यांचे दर्शन मिळणे म्हणजे आपल्या परिसराचा एक भाग जागतिक निसर्गसंपत्तीचा आहे, याची जाणीव होते. हे पाहून मन आनंदाने भरून जाते आणि निसर्गाचे संरक्षण करण्याची जबाबदारीही जाणवते." या भावनांमध्येच निसर्गाशी असलेली मानवी नाती, काळजी आणि प्रेम प्रतिबिंबित होते. शबल ससाणा आणि अन्य स्थलांतरित शिकारी पक्ष्यांचे आगमन पर्यावरणीय शिक्षणाचेही साधन ठरते. विद्यार्थी, अभ्यासक, स्थानिक नागरिक आणि पर्यटक एकत्र येऊन या पक्ष्यांचा अभ्यास करतात, त्यांचे व्यवहार समजतात आणि अधिवास संरक्षित करण्याच्या उपाययोजना आखतात. अशा अनुभवातून निसर्गाच्या संवेदनशीलतेची जाणीव होते आणि जैवविविधतेसाठी आपल्या छोट्या छोट्या प्रयत्नांचे महत्त्व समजते.

कडबनवाडीचा गवताळ परिसर हे उदाहरण दर्शवते की निसर्ग आणि मानवी समाज यामध्ये समतोल राखल्यास दुर्मिळ प्रजातींचे अस्तित्व टिकवता येते. स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन हा फक्त दृश्य सौंदर्य नव्हे, तर एक भावनिक अनुभव आहे – जिथे पक्षी निरीक्षकांचे कौतुक, नागरिकांची उत्सुकता, आणि निसर्गाशी आपुलकी यांचा संगम होतो. प्रत्येक शबल ससाण्याचे उडणे, प्रत्येक गरुडाचे पंख फडफडणे, आणि प्रत्येक शिकारी पक्ष्याचा आहार शोधणे ही घटना पाहताना हृदयाला नवे जीवनस्पंदन मिळते.

#### पर्यावरण जीवन समृद्ध करणारा

● भिगवण-कडबनवाडी गवताळ प्रदेशातील या आगमनाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, स्थानिक निसर्गाचे जतन करणे, नागरिकांचा सहभाग आणि जैवविविधतेचा संवर्धन हा फक्त पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर आपल्याला निसर्गाशी जोडणारा आणि जीवन समृद्ध करणारा अनुभव आहे. या गवताळ प्रदेशातील स्थलांतरित शिकारी पक्ष्यांचे आगमन हे स्थानिक नागरिकांसाठी, पक्षी निरीक्षकांसाठी आणि निसर्गप्रेमींसाठी एक भावनिक पर्वणीचे निमित्त ठरले आहे – जिथे हृदय भरून येते, डोळे चमकतात, आणि मनाला निसर्गाशी एक नवे नाते जोडले जाते.

---

## ई-पीक नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी ई-पीक पाहणी प्रक्रिया अत्यावश्यक असताना अनेकांना तांत्रिक अडथळे, स्मार्टफोनचा अभाव आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्येमुळे नोंदणी करता येत नव्हती. हा मोठा प्रश्न लक्षात घेऊन राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय जाहीर केला आहे. आता ई-पीक पाहणीची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीनेही राबवली जाणार असून १५ जानेवारीपर्यंत नोंदणीची मुदत देण्यात आली आहे.

राज्यातील बहुसंख्य शेतकरी अद्याप स्मार्टफोन वापरात पारंगत नसल्यामुळे किंवा ॲपवर नोंदणी करताना अडचणी येत असल्याने ई-पीक पाहणी प्रलंबित राहिली होती. त्याचा थेट परिणाम पीक विमा, आपत्ती मदत, अनुदान, कर्जमाफी आणि शासकीय योजनांचा लाभ मिळण्यावर होत होता. याच समस्येवर उपाय म्हणून महसूल विभागाने ऑफलाइन नोंदणीस परवानगी दिल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

पुणे, बारामती तालुका आणि ग्रामीण भागात अनेक शेतकरी अद्याप तंत्रज्ञानापासून दूर आहेत. आता अशा शेतकऱ्यांना संबंधित महसूल कार्यालयात, तलाठी कार्यालयात किंवा कृषी सहाय्यकांकडून पिकांचे सर्वेक्षण करून नोंदणी करता येणार आहे. यामध्ये शेतातील पिकांचा प्रकार, क्षेत्रफळ, पेरणीचे तपशील, स्थिती, अंदाजित उत्पादन इत्यादी माहिती नोंदवली जाईल. ई-पीक पाहणी ही नोंदणी प्रक्रिया राज्यातील कृषी विभागाने पारदर्शकता, पीक सर्वेक्षणाची अचूकता आणि आर्थिक सहाय्यासाठी सुरू केली आहे. मात्र व्यवहारात या योजनेचे डिजिटल स्वरूप हेच अनेकांसाठी सर्वात मोठे आव्हान ठरत होते. स्मार्टफोन नसणे, इंटरनेटची गती नसणे, ॲपचा वापर कठीण जाणे अशा समस्यांमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी वंचित राहिले होते. आता ऑफलाइन पद्धतीमुळे प्रत्यक्ष दस्तऐवजीकरणाद्वारे शेतकऱ्यांची नोंद होणार आहे. महसूल विभागातील कर्मचारी प्रत्यक्ष माहिती गोळा करून ती प्रणालीमध्ये अपलोड करतील. अशा प्रकारे ई-पीक पाहणी प्रक्रियेतील अडथळे दूर होऊन सर्वांना समान संधी उपलब्ध होणार आहे, असा विश्वास व्यक्त होत आहे. सध्या राज्यात हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान होते. अशा वेळी पिकांचे पंचनामे, विमा आणि आर्थिक मदत मिळवण्यासाठी ई-पीक पाहणी माहिती अनिवार्य आहे. या निर्णयामुळे पिकांची माहिती तंत्रज्ञानाला जोडली जाईल, परंतु कोणताही शेतकरी तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे वंचित राहणार नाही. राज्य सरकारच्या या पावलामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळून कृषीक्षेत्रात पारदर्शकता आणि माहितीचे अचूक संकलन साध्य होईल, अशी अपेक्षा आहे.

---

## चैतन्यच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला स्वराज्याचा रायगड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय, ओतूर येथील इयत्ता पाचवी ते नववीच्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्यास भेट दिली. या सहलीत विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट, शौर्यगाथा, मावळ्यांचा पराक्रम, गडकोट किल्ल्यांची रचना व स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्ष अनुभवली,

रायगडावर दरबार, होळीचा माळ, बाजारपेठ, विविध वाड्यांची रचना, धान्याची कोठारे, तटबंदी, जगप्रसिद्ध टकमक टोक तसेच महाराजांची समाधी स्थळ पाहताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह व अभिमान दिसून आला.

मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांच्या मार्गदर्शाखाली संजय हिरे, अनिल उकिरडे, भाऊसाहेब खाडे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, विशाल चौधरी व राजाराम शिंदे यांनी सहलीचे नियोजन केले होते. सहल यशस्वी होण्यासाठी अजित डांगे, संतोष कांबळे, मिलिंद खेत्री, संतोष सोनवणे, अमित झरेकर, मंगेश तांबे, सोनाली माळवे, शिल्पा भालेराव, सोनाली कांबळे, आसावरी गायकर, निर्मला डोंगरे, विजय खरात, ईश्वर ढमाले, योगेश फापाळे व अरविंद आंबरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

## आंबेगाव पूर्वेला बटाटा काढणीला वेग

### कांदा रोपांना सुगी, लागवडीत शेतकरी व्यस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** रब्बी हंगाम कांदा पिकासाठी पोषक ठरत असल्याने आंबेगाव तालुक्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात कांदा लागवडीत व्यस्त आहेत. कांद्याच्या बाजारभावात चढ-उतार असला तरी लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढल्याने कांदा रोपांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या कांदा प्रतिकिलो २६ ते २७ रुपये दराने विकला जात असताना, एक एकर लागवडीसाठी लागणाऱ्या रोपांसाठी १५ ते २० हजार रुपये खर्च येत आहे. त्यामुळे यंदा कांदा लागवड महागडी ठरत असली, तरी शेतकरी लागवडीपासून मागे हटलेले नाहीत. कांद्याची आवक कमी असल्याने दहा किलोस २६० ते २७० रुपये दर मिळत असून, डिसेंबर अखेरपर्यंत भाव स्थिर राहण्याचा अंदाज व्यक्त केला.

दरम्यान, कांदा उत्पादक शेतकरी संदीप आढाव म्हणाले की, सध्या कांदा लागवडीसाठी मजुरांना प्रत्येकी ४०० रुपये मजुरी द्यावी लागत असून, बाहेरगावच्या मजुरांसाठी गाडीभांडे वेगळे द्यावे लागत आहेत. साधारण एक एकर कांदा लागवडीसाठी १६ मजूर लागतात. बाजारभाव मिळाला नाही, आर्थिक फटका सहन करावा लागतो, असे त्यांनी सांगितले.

---

## शिक्रापूर कॅफेतील बलात्कारप्रकरणी कॅफे चालकासह आरोपी अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील एका कॅफेमध्ये महाविद्यालयीन युवतीवर बलात्कार करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने कोठडी सुनावली आहे. अभिराज प्रमोद चव्हाण (रा. निमगाव म्हाळुंगी) याच्यासह कॅफे चालक मंगेश निवृत्ती काळोखे (रा. शिक्रापूर) असे अटक केलेल्यांची नावे आहेत.

महाविद्यालयातून घरी जात असताना आरोपीने युवतीला कारमधून '१९०६' कॅफेमध्ये नेऊन लग्नाचा दबाव टाकत कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देऊन बलात्कार केल्याची तक्रार आहे. घाबरलेल्या पीडितेने कुटुंबीयांच्या मदतीने शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास केला. या प्रकरणात तपासादरम्यान कॅफेमध्ये स्वतंत्र व्यवस्था करून देण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याने कॅफे चालकासही अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर करीत आहेत.

---

## कारेगावात कोयत्याने हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** कारेगाव (ता. शिरुर) येथे घरगुती वादातून पत्नी, अल्पवयीन मुलगा व पत्नीच्या मित्राने एका इसमावर कोयत्याने हल्ला करून मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संस्कृती पार्क येथील रहिवासी गजानन देवकाते यांचे पत्नी प्रतिभा हिच्याशी वाद झाला होता. दुपारी घरासमोरील मैदानात असताना प्रतिभा, तिचा मित्र विशाल डोंगरे व अल्पवयीन मुलगा तेथे येऊन शिवीगाळ व दमदाटी करत लोखंडी गज व कोयत्याने हल्ला करून गजानन यांना जखमी केल्याची फिर्याद आहे.

याप्रकरणी गजानन उत्तमराव देवकाते यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रतिभा गजानन देवकाते, अल्पवयीन मुलगा व विशाल डोंगरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पुढील तपास पोलीस हवालदार अभिमान कोळेकर करीत आहेत.

---

## लोणीतील ज्येष्ठ सनई वादक सोपान पंचरास यांचे निधन



**लोणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथील प्रसिद्ध सनई वादक सोपान सिताराम पंचरास (वय ८३) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. लोणीचे माजी उपसरपंच अनिल पंचरास यांचे ते वडील होत. पंचरास सनईच्या सुमधुर सुरांनी अनेक दशकांपर्यंत लग्नसमारंभ, मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रम रंगवणारे पंचरास हे पंचरास वाजंत्री ताफ्यातील नामवंत कलाकार होते.

---

## घोड शाखेला पाणी सोडल्याने रब्बी पिकांना होणार फायदा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** जलसंपदा विभागाने डिंभे धरणाच्या ( हुतात्मा बाबू गेनू जलसागर) डाव्या कालव्याच्या घोड शाखेला रब्बी हंगामातील पाण्याचे आवर्तन सोडले. यामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमधील पिकांना फायदा होणार आहे.

घोड शाखा आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील जाधववाडी, कारफाटा ,थोरांदळे, खडकी, नागापूर ,जवळे, भराडी आदी गावातील शेतीसाठी वरदान ठरली आहे. घोड शाखा कोरडी पडल्याने या गावांमधील शेतकऱ्यांनी घेतलेल्या रब्बी हंगामातील पिकांना पाण्याचा ताण बसला होता. या भागात कांदा लागवडी मोठ्या प्रमाणावर झाल्या आहेत. तसेच गहू, हरभरा, इतर वेलवर्गीय पिके देखील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी घेतली आहेत. घोड शाखेला रब्बी हंगामातील पाण्याचे आवर्तन त्वरित सोडण्याची मागणी वरील गावातील शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार जलसंपदा विभागाने घोड शाखेला पाण्याचे आवर्तन सोडले. या पाण्याचा सर्व पिकांना फायदा मिळणार आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या मका, घास, कडवळ आदी चारा पिकांना पाण्याचा फायदा होणार आहे.

---

## शिक्रापूरातील एमएसआयडीसी रस्ता कागदावरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील वाढती वाहतूककोंडी सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून शिक्रापूर-चाकण मार्गावर ५४८ डी क्रमांकाच्या रस्त्याचे नियोजन करण्यात आले आहे. संबंधित जमिनींवर शेरेही लावण्यात आले; मात्र प्रत्यक्षात हा रस्ता फक्त कागदावरच राहिला असून जमिनीवर शेरे पडलेल्या अनेक गटांमध्ये चक्क गुंठेवारी सुरू असल्याने नागरिकांची फसवणूक होत असल्याचा आरोप होत आहे.

प्रशासनाने सर्वेक्षण करून जुना टोलनाका ते तळेगाव ढमढेरे हद्दीतून न्हावरा रस्त्याला जोडणाऱ्या या नियोजित बायपासला मंजुरी दिली होती. तथापि, काम सुरू न झाल्याने सध्या मूळ शिक्रापूर-तळेगाव-न्हावरा रस्त्याचेच रुंदीकरण सुरू आहे. यामुळे शेकडो झाडांची कत्तल, दुकाने हटवण्याची वेळ येऊन व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत असून तळेगाव ढमढेरे येथील मुख्य चौकातील बाजारपेठ उध्वस्त होत असल्याची नागरिकांची भावना आहे.

दरम्यान, झोन नकाशावर ६० मीटर बायपास दर्शविण्यात आलेल्या भागात काही ठिकाणी भिंती उभारून गुंठेवारी व जागाविक्री सुरू असल्याचेही समोर आले आहे.

याबाबत पुणे महानगर विकास प्राधिकरण व संबंधित विकास महामंडळाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. ५४८ डी क्रमांकाचा नियोजित रस्ता तातडीने खुला करून काम मार्गी लावावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

---

### 'मविआ'-राष्ट्रवादी हातमिळवणीच्या तयारीत

# पिंपरी-चिंचवडमध्ये पक्षांतराचे वारे!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-पिंपरी-चिंचवड : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराचे प्रमाण वाढले आहे. माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील आणि राहुल कलाटे यांनी आपले पक्ष सोडले असून, सीमा सावळे आणि अश्विनी जाधव यांनी भाजपला सोडून राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. या घडामोडी स्थानिक राजकीय समीकरणात मोठे बदल घडवून आणण्याची शक्यता निर्माण करत आहेत.**

महापालिका निवडणुकांचे जाहीर होण्यापासूनच पक्षांतराची गती वाढली असून, नेते आपला प्रभाग सुरक्षित ठेवून सोयीचा पक्ष निवडत आहेत. माजी महापौर वाघेरे-पाटील यांनी मावळ लोकसभा, तर राहुल कलाटे यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. आता दोघेही भारतीय जनता पक्षाच्या संपर्कात आहेत, ज्यामुळे आगामी निवडणुकीचे समीकरण बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे आणि माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांनी भाजप सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला, ज्यामुळे स्थानिक पातळीवर पक्षांतराच्या घडामोडींना वेग लागला आहे. पुढील काही दिवसांत आणखी अनेक नेत्यांचे प्रवेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजपविरोधात एकत्र लढण्यासाठी महाविकास आघाडीची पाचवी बैठक पिंपरीत झाली. माजी आमदार गौतम चाबुकस्वार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामटे, कॉंग्रेसचे पदाधिकारी मयूर जयस्वाल, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यासह अनेक नेते उपस्थित होते. या बैठकीत अनेकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेससोबत हातमिळवणी करण्याची तयारी दर्शविली.

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर आणि त्यांच्या भवितव्यावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शिवसेनेचे समन्वयक विजय गुप्ता म्हणाले, "ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्ष बदलून येणाऱ्या बलाढ्य उमेदवारांना तिकीट दिले जाते. त्यामुळे निष्ठावान कार्यकर्त्यांना नेमके काय करायचे, असा प्रश्न निर्माण होतो."

दरम्यान, वाकड भाजपमध्ये अस्वस्थता पसरली असून, राहुल कलाटे आणि इतर नेत्यांच्या प्रस्तावित भाजप प्रवेशाला विरोध दर्शविला गेला. विश्वासात घेऊन प्रवेश दिला जावा, अशी मागणी बैठकीत केली गेली. माजी नगरसेवक विनायक गायकवाड, भाजपचे शहर उपाध्यक्ष विशाल कलाटे, राम वाकडकर, भाजप ओबीसी मोर्चाचे शहराध्यक्ष चेतन भुजबळ, महिला मोऱ्यांचे प्रदेश पदाधिकारी प्रा. भारती विनोदे आणि श्रीनिवास कलाटे या वेळी उपस्थित होते.

---

## शेतकरी सभासदांची ई-आधार आणि फार्मर आयडीसाठी गर्दी

**लोणी :** आंबेगाव तालुक्यातील विविध सहकारी सोसायटींनी शासनाला कर्जदार सभासंदांची माहिती सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासाठी सभासदांनी आपले ई-आधार कार्ड, बँक पासबुक, पॅन कार्ड व फार्मर आयडी झेरॉक्स करून स्वाक्षरीसह २० डिसेंबरपर्यंत सोसायटीत सादर करणे आवश्यक आहे. यामुळे लोणी आणि इतर गावांमधील सेवा केंद्रांवर शेतकरी सभासदांची गर्दी दिसून आली. सेवा केंद्र चालक सागर थोरात यांनी सांगितले की, फार्मर आयडी व ई-आधार कार्ड मिळवण्यासाठी फक्त पाच मिनिटांचा वेळ लागतो, त्यामुळे गर्दीत घाई करू नये.

शेतकरी वर्ग शेतातील कामाच्या व्यस्ततेत असल्याने प्रशासनाने फार्मर आयडी आणि ई-आधार कार्डसाठी मुदत वाढवावी, अशी मागणी पहाडदरा सोसायटीचे चेअरमन जयदिप वीर आणि सरपंच मच्छिंद्र वाघ यांनी केली आहे.

---

## सांगवीत तरुणावर हल्ला करणारे आठ जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** जुन्या वादातून बारा जणांच्या टोळक्याने कोयता व दांडक्याने तरुणावर हल्ला करत परिसरात दहशत निर्माण केल्याची घटना गुरुवारी (१८ डिसेंबर) रात्री जुनी सांगवी येथे घडली. या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली असून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रथमेश प्रशांत कवडे (२१, जुनी सांगवी) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आयुष गोहिरे, विराज काटे, रितिकेश गोहिरे, सिद्धार्थ निकाळजे, सागर जगदनकर, आर्यन थोरात, शुभम ढवळे आणि रित्या गुरव यांना अटक केली आहे.

पोलिसांनी सांगितले की, फिर्यादी व त्यांचा मित्र थंडीमुळे शेकत बसले असताना आरोपी दुचाकीवरून घटनास्थळी आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यावर कोयत्याने वार केला.

### चिंचवडमध्ये गांजा विक्रीचा प्रयत्न; तरुण ताब्यात

**पिंपरी :** चिंचवड येथील बिजलीनगर परिसरात गांजाची विक्री करण्यासाठी आलेल्या तरुणाला पोलिसांनी सापळा लावून अटक केली. आरोपीकडून २७ हजार रुपये किमतीचा ५१८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. सलीम मोहम्मद बागवान (२६, चिंचवडेनगर) असे आरोपीचे नाव आहे.

### कारमधून एमडी विक्री

**पिंपरी :** आलिशान मोटारीतून मेफेड्रोन (एमडी) विक्रीसाठी आलेल्या तरुणाला तळेगाव दाभाडे पोलिसांनी अटक केली. ड्रग्स, मोटार, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण २४ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी रात्री मनोहरनगर, तळेगाव दाभाडे येथे करण्यात आली. ओम रवींद्र आभाळे (२२, तळेगाव दाभाडे) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी मोटारीची झडती घेतली असता ३९.८९ ग्रॅम एमडी आढळून आली.

## सारांश वृत्त

### सामूहिक बलात्कार: चौघांना जन्मठेप

**संभल (उत्तर प्रदेश) :** ३८ वर्षीय महिलेवर बलात्कार करून तिला जिवंत जाळल्याप्रकरणी येथील एका न्यायालयाने शुक्रवारी चौघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश अवधेश कुमार सिंह यांनी निकाल दिला आणि आरोपींना प्रत्येकी १.१२ लाख रुपयांचा दंडही ठोठावला. सहाय्यक जिल्हा शासकीय वकील हरी ओम प्रकाश यांनी सांगितले की, गुन्ह्याच्या वेळी अल्पवयीन असलेल्या आरोपींपैकी एकावर बाल न्याय मंडळासमोर स्वतंत्रपणे खटला सुरू आहे.

### बंगळुरुमध्ये महिला डॉक्टरचा विनयभंग

**बेंगळूर :** निवासात परतत असताना एका अज्ञात व्यक्तीने एका २८ वर्षीय महिला डॉक्टरचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना मध्यरात्री सोलादेवनहल्ली पोलिस ठाण्याच्या हद्दीत एजीबी लेआउटमध्ये घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला रात्री १ वाजण्याच्या सुमारास रुग्णालयात आपली ड्युटी पूर्ण करून आपल्या पीजी निवासात परत येत होती, जेव्हा एक अज्ञात व्यक्ती पांढऱ्या स्कूटरवरून तिच्याजवळ आली आणि तिचा विनयभंग केला.

### जंगली हत्तींनी दोघांना चिरडले

**रामगड :** झारखंडच्या रामगड जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये जंगली हत्तींनी एका महिलेसह दोन जणांना चिरडले आणि ठार केले. लोकनाथ मुंडा (३५) आणि काजोल देवी (४२) हे अनुक्रमे मांडू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुगिया गावात आणि कुंदरू-सरैया गावात सकाळी बाहेर गेले होते. त्यावेळी ही घटना घडली. पीडितांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ हजार रुपयांची तातडीची मदत देण्यात आली आहे.

## कट्टरपंथीयांकडून हिंसक घटना; माध्यमांच्या कार्यालयालाही केले लक्ष्य

# बांगलादेशात हिंसाचार उसळला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ढाका :** शरीफ उस्मान हादी यांच्या निधनानंतर बांगलादेशात हिंसाचार उसळला आहे. ढाकापासून चटगावपर्यंत कट्टरपंथी आंदोलकांनी अनेक ठिकाणी आग लावली. यात माध्यम कार्यालयालाही लक्ष्य करण्यात आले. गेल्या वर्षी जुलैमध्ये बांगलादेशात झालेल्या उठावाच्या प्रमुख नेत्यांपैकी हादी हे एक होते आणि त्यांनी भारताविरूद्ध विष ओतले होते. बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीवर भारताच्या माजी राजनैतिक अधिकारी वीणा सिक्री यांनी युनूस सरकारवर जोरदार निशाणा साधला आणि त्यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश सरकारचा पर्दाफाश केला.

बांगलादेशात होत असलेल्या निदर्शनांवर माजी भारतीय मुत्सद्दी वीणा सिक्री यांनी सांगितले की, बांगलादेशात संपूर्ण जमावशाही आहे. सर्वप्रथम, हे घटनात्मक सरकार नाही. हे बेकायदेशीर सरकार आहे आणि त्यांना निवडणुका घेण्याचा कोणताही अधिकार नाही. ढाकाच्या जमात-ए-इस्लामीच्या नेतृत्वाखाली ही संपूर्ण बंडखोरी मोहीम राबविण्यात आली. हे पाकिस्तानने बाह्य शक्तींच्या पाठिंब्याने केले होते आणि आता जमात-ए-इस्लामी उन्माद भडकवण्याचा प्रयत्न करीत आहे. जमात-ए-इस्लामीला बहुमत मिळेल, असं वाटत होतं. पण नंतर त्याच्या लक्षात आले की मुहम्मद युनूस यांनी गेल्या १८ महिन्यांत जे केले त्याबद्दल लोक खूप नाखूष आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

जमात-ए-इस्लामीच्या या अलोकप्रियतेचा प्रतिकार करण्यासाठी ते सर्व प्रकारचे उन्माद भडकवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी काय केले आहे की, निवडणूक प्रचाराचा एक भाग म्हणून, त्यांचा एक माणूस उस्मान हादी याला गोळ्या घालून ठार मारण्यात आले. गोळीबार झाल्यानंतर काही सेकंदातच ते कोणत्याही चौकशीशिवाय, कोणत्याही पुराव्याशिवाय भारतावर दोषारोप करण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्याला या भूमिकेकडे परत यावे लागेल की भारताने दिल्लीतील बांगलादेशाच्या उच्चायुक्तांना सांगितले आहे की तुम्हाला मुक्त, निष्पक्ष, सर्वसमावेशक आणि सहभागात्मक निवडणुका घ्याव्यात. विश्वासार्ह निवडणुका झाल्याशिवाय बांगलादेशातील जनता ते स्वीकारणार नाही. त्यांच्याकडे योग्य काळजीवाहू सरकार असले पाहिजे, असे मानले जाते.

बांगलादेशातील भारतीय दूतावासांवर जमावाने केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, माजी उपराष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पंकज सरन यांनी दोन्ही देशांना द्विपक्षीय संबंधांमध्ये कोणत्याही शक्तीला हस्तक्षेप करू देऊ नये आणि चिथावणीखोर वक्तव्ये आणि कृती टाळण्याचा सल्ला दिला आहे. बांगलादेशात भारताचे उच्चायुक्त म्हणून काम करणारे सरन यांनी इशारा दिला की, चिथावणीखोर कृती आणि वक्तव्ये वातावरण खराब करण्याचे काम करत आहेत. बांगलादेशातील विविध विद्यार्थी नेत्यांनी भारत आणि भारतीय मुत्सद्दी यांच्याविरोधात केलेल्या वक्तव्याचा संदर्भ ते देत होते.

### बांगलादेशातील निदर्शनावर गंभीर चिंता व्यक्त

कॉंग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी बांगलादेशात सुरू असलेल्या निदर्शनांवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. शुक्रवारी ते म्हणाले, आम्ही चिंतेत आहोत. बांगलादेशातील काही अनियंत्रित घटक खूप मूर्खपणाच्या गोष्टी बोलत आहेत. तुम्ही अलीकडेच एका विद्यार्थी नेत्याचे विधान पाहिले असेल ज्यामध्ये त्याने सांगितले होते की तो सात राज्यांना उर्वरित भारतापासून वेगळे करणार आहे. असे बोलणारा कोण आहे? पण लोक हे करत आहेत. म्हणून आम्ही खूप सावध आहोत की असे घटक मुक्तपणे फिरत आहेत, असे ते म्हणाले. संसद संकुलाबाहेर पत्रकारांशी बोलताना शशी थरूर म्हणाले, आम्हाला आशा आहे की अधिकाऱ्यांकडून काही रचनात्मक पावले उचलली जातील. बांगलादेशातील भारताच्या मूलभूत हितसंबंधांना हानी पोहोचवू नये, त्याचप्रमाणे आम्ही बांगलादेशातील स्थिरता, शांतता आणि लोकशाहीचे समर्थन करण्यासाठी देखील सतर्क राहू, असेही त्यांनी सांगितले. गेल्या वर्षी जुलैमध्ये बांगलादेशातील उठावाचे प्रमुख नेते शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर विविध भागात निदर्शने आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या, ज्यामुळे देशभरात तणाव निर्माण झाला. आंदोलकांनी शेख मुजीबुर रहमान यांच्या निवासस्थानाची तोडफोड केली, जे आधीच कोसळले आहेत. गुरुवारी रात्री बांगलादेशातील विविध भागात हल्ले आणि तोडफोडाच्या घटना घडल्या आहेत, ज्यात चितगाव येथील भारताच्या सहाय्यक उच्चायुक्तांच्या निवासस्थानी दगडफेक करण्यात आली आहे. या काळात भारतविरोधी घोषणाही देण्यात आल्या. मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी इंकलाब मंचाचे नेते हादी यांच्या निधनाची पुष्टी केल्यानंतर या घटना घडल्या. १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत हादी हे एक उमेदवार होते. सहा दिवस जीवन-मरणाची लढाई लढल्यानंतर सिंगापूरमधील रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

बांगलादेशात तैनात असलेल्या भारतीय उच्चायुक्तांना किंवा भारतीय मुत्सद्दी यांना कोणतीही हानी पोहोचू नये यासाठी भारत सरकार परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवेल, असेही ते म्हणाले.

## उरुळी कांचनच्या सरपंचपदी मिलिंद जगताप

### दोन गटात बाचाबाची निवडणुकीत काही काळ तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**उरुळी कांचन :** उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी शुक्रवारी (दि. १९) झालेल्या निवडणुकीत मिलिंद तुळशीराम जगताप यांची ९ विरुद्ध ६ मतांनी निवड झाली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान दोन गटांत बाचाबाची होऊन काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

तत्कालीन सरपंच ऋतुजा कांचन यांच्या राजीनाम्यानंतर सरपंचपद रिक्त झाल्याने विशेष सभा घेऊन निवडणूक पार पडली. सरपंचपदासाठी मिलिंद जगताप आणि प्रियांका ओंकार कांचन यांचे प्रत्येकी एक अर्ज होते. ग्रामपंचायतीच्या १६ सदस्यांपैकी १५ जण उपस्थित होते. गुप्त मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत जगताप यांना ९ तर कांचन यांना ६ मते मिळाली. ही निवडणूक मंडल अधिकारी माधुरी बागुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. निकाल जाहीर होताच जगताप यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. निवडीनंतर त्यांनी ग्रामस्थांचे आभार मानत मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते व नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, मतदानावेळी दोन गटांत झालेल्या वादानंतर उरुळी कांचन पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिस बंदोबस्तामुळे पुढील प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली.

## बांगलादेशातील उद्रेक, चिकन नेक धोक्यात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशात युवा नेता शरीफ उस्मान हादी यांच्या निधनानंतर उसळलेल्या भारतविरोधी निदर्शनांनी केवळ राजकीय तापमान वाढवलेले नाही, तर भारताच्या धोरणात्मक सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. सिलीगुडी कॉरिडॉर तोडण्याच्या धमक्या देत 'सेव्हन सिस्टर्स' वेगळ्या करण्याची भाषा वापरली जात असली, तरी प्रत्यक्षात हा भारताचा सर्वाधिक सुरक्षित आणि अभेद्य भूभाग असल्याचे वास्तव आहे.

बांगलादेशात सध्या भारतविरोधी निदर्शनांनी जोर धरला आहे. २०२४ च्या विद्यार्थी चळवळीत सक्रिय भूमिका बजावणारे आणि भारतविरोधी वक्तृत्वासाठी ओळखले जाणारे युवा नेते शरीफ उस्मान हादी यांच्या निधनानंतर देशातील अनेक शहरांत हिंसाचार उसळला. ढाका, चटगावसह विविध ठिकाणी निदर्शक रस्त्यावर उतरले. घोषणाबाजी, दगडफेक आणि भारतीय दूतावास तसेच सहाय्यक उच्चायुक्तालयांच्या परिसरात जाळपोळ करण्यात आली. या निदर्शनांचा सूर भावनिक उद्रेकापुरता मर्यादित राहिला नाही. काही आंदोलकांनी भारताच्या ईशान्येकडील राज्यांना मुख्य भूमीपासून तोडण्याची भाषा करत सिलीगुडी कॉरिडॉर म्हणजेच 'चिकन नेक' लक्ष्य करण्याच्या धमक्या दिल्या. 'सेव्हन सिस्टर्स' वेगळ्या करण्याच्या घोषणांमुळे या आंदोलनांना धोरणात्मक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट होते. सिलीगुडी कॉरिडॉर हा भारताच्या ईशान्य भागासाठी जीवनवाहिनी मानला जातो. पश्चिम बंगालच्या उत्तर भागातील ही अरुंद पट्टी मुख्य भारताला आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, मेघालय, त्रिपुरा आणि सिक्कीम या आठ राज्यांशी जोडते. सर्वात अरुंद ठिकाणी अवघ्या २० ते २२ किलोमीटर रुंद आणि सुमारे ६० किलोमीटर लांबीच्या या मार्गातून रस्ते, रेल्वे आणि इंधन पुरवठा व्यवस्था जाते. या मार्गात अडथळा निर्माण झाला, तर सुमारे साडेचार कोटी लोकसंख्या आणि लष्करी पुरवठ्यावर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. भौगोलिकदृष्ट्या हा परिसर अत्यंत संवेदनशील मानला जातो. दक्षिणेला बांगलादेश, पश्चिमेला नेपाळ, उत्तरेला भूतान आणि चीनचे चुंबी खोरे अगदी जवळ असल्याने हा भाग कायमच चीनच्या रणनीतिक नजरेत राहिला आहे. २०१७ च्या डोकलाम वादात या भागाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले होते.

**भारत हा सुरक्षित आणि अभेद्यच**

## कर्नाटकात मुख्यमंत्रीपद पुन्हा एकदा ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** कर्नाटकात मुख्यमंत्रिपदासाठी सुरू असलेला संघर्ष आणि बदलाबद्दलची अटकळ पुन्हा एकदा तीव्र झाली आहे. बेळगावमध्ये, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना पाठिंबा देणारे आमदार बुधवारी रात्री वरिष्ठ सार्वजनिक बांधकाम मंत्री सतीश जारकीहोळी यांनी आयोजित केलेल्या रात्रीच्या जेवणात सहभागी झाले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे पुत्र आणि आमदार यतींद्र सिद्धरामय्या आणि आमदार केएन राजन्ना यांच्यासह तीसहून अधिक आमदार या मेळाव्याला उपस्थित होते. तथापि, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आरोग्याच्या कारणास्तव या कार्यक्रमाला वैयक्तिकरित्या उपस्थित राहू शकले नाहीत. जारकीहोळी यांनी राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात या बैठकीचे वर्णन "सामान्य सामाजिक संमेलन" म्हणून केले, परंतु उपस्थित असलेल्या अनेक आमदारांनी राजकीय मुद्द्यांवरही चर्चा झाल्याचे सूचित केले. मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय मानले जाणारे के. एन. राजन्ना यांनी पक्षाची रणनीती आणि नेतृत्वाशी संबंधित बाबी चर्चेचा भाग असल्याच्या दुजोरा दिला. अशा बैठकांमुळे सामाजिक संवादाव्यतिरिक्त इतर अनेक उद्देश साध्य होतात यावर त्यांनी भर दिला. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी अशाच कार्यक्रमाचे आयोजन केल्याच्या एका आठवड्यानंतर या जेवणाचे आयोजन करण्यात आले. यावरून कर्नाटक कॉंग्रेसमधील गटबाजी उघड झाली आहे. कर्नाटकातील कॉंग्रेस सरकारचा २० नोव्हेंबर रोजी अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर नेतृत्व बदलाच्या शक्यतांना वेग आला आहे.

## तृणमूलच्या महुआ मोईत्रा यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तृणमूल कॉंग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांना दिल्ली उच्च न्यायालयाने कॅश फॉर क्वेरी प्रकरणात मोठा दिलासा दिला आहे. सीबीआयला त्यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्याची परवानगी देणारा लोकपालचा आदेश न्यायालयाने रद्द केला आहे. न्यायमूर्ती अनिल खेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने या याचिकेवर निकाल दिला. तत्पूर्वी, खंडपीठाने सर्व पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवला होता. सीबीआयला त्यांच्यावर कारवाई करण्याची परवानगी देण्याच्या लोकपालच्या १२ नोव्हेंबरच्या आदेशाला मोईत्रा यांनी आव्हान दिले आहे.

सुनावणीच्या शेवटी मोईत्रा यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील निदेश गुप्ता यांनी सीबीआयच्या कारवाईला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली होती.



**कॅश फॉर क्वेरी प्रकरणात लोकपालचा आदेश रद्द**

मात्र, खंडपीठाने त्या टप्प्यावर कोणताही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला होता. मोईत्रा यांनी म्हटले आहे की, लोकपालने त्यांच्या लिखाणाचा योग्य विचार न करता या कारवाईला मान्यता दिली, जरी त्यांचे उत्तर मागितले गेले असले तरी. तोंडी युक्तिवादाला देखील परवानगी देण्यात आली. महुआ मोईत्रा यांच्यावर उद्योगपती दर्शन हिरानंदानी यांच्या सांगण्यावरून संसदेत प्रश्न विचारल्याचा आरोप आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. दुबे यांनी असा दावा केला की वकील जयंत देहराई यांनी त्यांना पुरावे दिले होते. यानंतर निशिकांत दुबे यांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून सांगितले की, जय अनंत हे महुआचे जुने मित्र आहेत आणि त्यांनी सांगितले आहे की, महुआ मोईत्राने दर्शना हिरानंदानीकडून लाच घेतल्यानंतर संसदेत प्रश्न विचारले. महुआ मोईत्रा यांनी विचारलेल्या ६१ प्रश्नांपैकी ५० प्रश्न हिरानंदानी आणि त्यांच्या कंपनीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विचारण्यात आले होते, असा दावा त्यांनी केला होता. महुआ मोईत्रा यांची बाजू मांडणारे वकील निदेश गुप्ता यांनी म्हटले होते की, लोकपालने लोकपाल आणि लोकायुक्त कायदा, २०१३ मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे उल्लंघन केले आहे. कलम २० (७) मुळे लोकपालला आरोपी लोकसेवकाची टिप्पणी घेणे आवश्यक होते, परंतु लोकपालने आवश्यक कार्यवाही पूर्ण न करता आरोपपत्र मंजूर केले.

## युवराज सिंग बरोबरच सोनू सूदची मालमत्ता जप्त

**नवी दिल्ली :** सट्टेबाजी प्लॅटफॉर्म संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. त्याने अनेक क्रिकेटपटू आणि कलाकारांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत. एजन्सीने क्रिकेटपटू युवराज सिंग, रॉबिन उथप्पा, अभिनेता सोनू सूद, नेहा शर्मा आणि इतरांची मालमत्ता जप्त केली आहे. या प्रकरणात एजन्सीने अनेक क्रिकेटपटू आणि बॉलिवूड अभिनेत्रींची चौकशी केली आहे, त्यानंतर मालमत्ता जप्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली होती. यापूर्वीयाच प्रकरणात माजी क्रिकेटपटू शिखर धवन आणि सुरेश रैना यांच्या चौकशीनंतर फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने (एफआयए) ११.१४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली होती.

## हिवाळी अधिवेशनाचे सुप वाजले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निवडणूक सुधारणा आणि वंदे मातरम या मुद्द्यांवर झालेल्या चर्चेनंतर संसदेची लोकसभा आणि राज्यसभेची दोन्ही सभागृहे (शुक्रवार) अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आली. याबरोबरच संसदेचे हिवाळी अधिवेशन संपले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्व पक्षांच्या नेत्यांना परंपरेनुसार चहा पार्टी दिली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अनेक केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

मागील अधिवेशनाप्रमाणे या अधिवेशनानंतर कॉंग्रेस नेतेही पक्षात सहभागी झाले होते. राहुल गांधी यांच्या अनुपस्थितीत त्यांची मोठी बहीण आणि सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. चहापानाच्या वेळी त्या राजनाथ सिंह यांच्या जवळ बसल्या होत्या, तर त्यांच्यासमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सभापती ओम बिर्ला बसले होते.

माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे की, प्रियांका गांधी यांनी तेथे उपस्थित खासदारांना सांगितले की, अॅलर्जी टाळण्यासाठी त्या एका विशिष्ट प्रकारच्या औषधी वनस्पतीचा वापर करतात, जी त्यांनी त्यांच्या संसदीय मतदारसंघ वायनाडमधून आणली आहे. यावर पंतप्रधान मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हसायला लागले. या चर्चेदरम्यान प्रियांका यांनी पंतप्रधान मोदींना त्यांच्या नुकत्याच झालेल्या परदेश दौऱ्यांबद्दलही विचारले. यावर पंतप्रधानांनी उत्तर दिले की ही भेट चांगली होती.

समाजवादीचे नेते धर्मेंद्र यादव म्हणाले की, अधिवेशन थोडे लांब असते तर बरे झाले असते. यावर पंतप्रधानांनी हसून उत्तर दिले, तुमचा घसा खवखवू नये, म्हणून आम्ही हे छोटेसे सत्र ठेवले. हे ऐकताच उपस्थित लोक हसायला लागले. धर्मेंद्र यादव हे सभागृहात विरोधकांच्या वतीने घोषणाबाजी करण्यासाठी ओळखले जातात.

## अलाहाबाद उच्च न्यायालयाचा अधिकाऱ्यांसाठी माननीय आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनौ :** अलाहाबाद उच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांसाठी 'माननीय' हा शब्द वापरण्यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. 'माननीय' हा शब्द कोणत्याही नोकरशहा किंवा अधिकाऱ्याला सूचित करत नाही. या संदर्भात उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारकडे उत्तर मागितले आहे. न्यायालयाने प्रधान सचिवांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले आहे. न्यायमूर्ती अजय भनोट आणि न्यायमूर्ती गरिमा प्रसाद यांच्या खंडपीठाने योगेश शर्मा नावाच्या व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना हा आदेश दिला.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे की,'माननीय हा शब्द केवळ मंत्री आणि सार्वभौम अधिकाऱ्यांच्या बाबतीतच वापरला जाईल, असे आधीच नमूद करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांच्या बाबतीत 'माननीय' हा शब्द लागू होत नाही. उच्च न्यायालयाने प्रधान सचिवांना निर्देश देताना म्हटले की, जे अधिकारी त्यांच्या पदापुढे किंवा नावापुढे 'माननीय' शब्द लावू शकतात त्यांच्यासाठी काही प्रोटोकॉल आहे की नाही हे न्यायालयाला सांगा. प्राथमिक शाळेत तपासणी दरम्यान गैरहजर आढळलेल्या शिक्षकांच्या निलंबनाच्या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. शाळांमधील शिक्षकांची उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी तीन महिन्यांत धोरण तयार करण्याचे निर्देशही कोर्टाने राज्य सरकारला दिले. इंद्रा देवी आणि लीना सिंग चौहान यांनी दाखल केलेल्या रिट याचिका निकाली काढताना न्यायमूर्ती प्रकाश पाडिया म्हणाले की, शिक्षक हे ज्ञानाचे आधारस्तंभ आहेत आणि त्यांना भारतीय संस्कृतीत गुरूचा दर्जा आहे. जिल्हा बेसिक शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाला दोन्ही शिक्षकांनी आव्हान दिले होते.

## नीट, इंडिगो, महिला आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाचा थेट दणका

# होय, कायदा हलक्यात घेऊ नका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : शिक्षण, सेवा आणि संस्थात्मक कारभारात नियमांकडे डोळेझाक सहन केली जाणार नाही, असा थेट इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. इंडिगो विमानसेवेवरील प्रवासी तक्रारी असोत वा नीट पात्रतेतील तडजोड, वकील परिषदांतील लिंगसमता असो वा निवडणूक मुदतींचा प्रश्न—न्यायालयाचा हस्तक्षेप केवळ दुरुस्तीसाठी नाही, तर व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी आहे, हे या निर्णयांतून ठळकपणे पुढे आले आहे.**




इंडिगो विमानसेवेच्या वारंवार होणाऱ्या उशिरा आणि रद्दीकरणांमुळे प्रवाशांचे मूलभूत हक्क बाधित होत असल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने स्पर्धा आयोगाला सखोल चौकशीचे निर्देश दिले. 'सेवा देणाऱ्यांची सोय नव्हे, तर नागरिकांचे हक्क केंद्रस्थानी' हा स्पष्ट संदेश यातून दिला गेला.

राजस्थानमधील बीडीएस प्रवेशप्रकरणात नीट पात्रता नियम कोणत्याही परिस्थितीत शिथिल करता येणार नाहीत, असा ठाम निर्णय देत नियम मोडणाऱ्या महाविद्यालयांवर प्रत्येकी दहा कोटी रुपयांचा दंड लावण्यात आला. प्रवेश प्रक्रियेतील शुचित्ता आणि गुणवत्तेला तडजोडीची जागा नाही, हे न्यायालयाने पुन्हा अधोरेखित केले.

विधिक क्षेत्रात तेलंगणा आणि आंध्र प्रदेश वकील परिषदांमध्ये ३० टक्के महिला आरक्षण लागू करण्याचे आदेश देत, न्यायालयाने 'समतेची केवळ घोषणा नव्हे, तर अंमलबजावणी आवश्यक' हा दृष्टिकोन स्पष्ट केला. यासोबतच पाच उच्च न्यायालयांसाठी नवीन मुख्य न्यायाधीशांची शिफारस करून न्यायव्यवस्थेतील प्रशासनिक स्थैर्यालाही चालना देण्यात आली. निवडणूक आयोगाला केरळ आणि उत्तर प्रदेशातील निवडणूक मुदतींबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे निर्देश देत, लोकशाही प्रक्रियेत प्रशासनिक सोयीपेक्षा नागरिकांचा अधिकार महत्त्वाचा असल्याचे न्यायालयाने बजावले.

सर्वोच्च न्यायालयाने व्यवस्थेला स्पष्टपणे सांगितले आहे—नियम हे लवचिक नसून बंधनकारक आहेत. सेवा क्षेत्रात नागरिक उपभोक्ता आहेत, शिक्षणात गुणवत्ता हा न्यायाचा गाभा आहे, विधिक क्षेत्रात प्रतिनिधित्व ही समतेची कसोटी आहे आणि लोकशाहीत निर्णयप्रक्रियेचा केंद्रबिंदू नागरिक असतो. न्यायालयाचा हा हस्तक्षेप तात्कालिक वादांवरचा उपाय नसून, प्रशासनिक बेफिकिरीला दिलेला दीर्घकालीन इशारा आहे.